बुध्द काळात इंग्लिश महीने नव्हते.

बुध्द काळात इंग्लिश महीने नव्हते. संस्कृत मधेही नव्हते, पाली भाषेत महीने व वार होते. भारत देश जंबुद्विप म्हणून ओळखला जात होता आणि त्यावेळची मुख्य बोलिभाषा ही पाली होती. मराठी कॅलेंडर (दिनदर्शिका) हे बुद्धांच्या काळात बुद्ध समकालीन पाली भाषेत कॅलेंडर (दिनदर्शिका) होते. चक्रवर्ती सम्राट अशोक राजाच्या निर्वाणानंतर कालांतराने पाली भाषेतील कॅलेंडर (दिनदर्शिका) हे मराठी भाषेत रूपांतरीत करण्यात आले. हे पहा सम्राट अशोक यांचे साम्राज्य व धम्म प्रचार केलेला प्रदेश.... भारतासह... पाकिस्तान... नेपाळ... बांग्लादेश... म्यानमार... श्रीलंका... अफगाणिस्तान... भूतान... इराण... तुर्कमेनिस्तान... ताजिकिस्तान... उझबेकिस्तान, इजिप्त, अझरबैजान इराक, तुर्की इत्यादी.

जम्बुव्दिप/नागरी संस्कृती कालीन महिण्यांचे व दिवसांचे नावे पुढीलप्राने आहेत.

पाली	इंग्रजी	मराठी
पाली (Pali)	इंग्रजी (English)	मराठी (Marathi)
१) फुस्स मासो	जानेवारी (January)	पौष
२) माघ मासो	फेब्रुवारी (February)	माघ
३) फगुणो मासों	मार्च (March)	फाग
४) चेत मासो	एप्रिल (April)	चैत्र
५) वेसाख मासो	मे (May)	वैशाख
६) जेठ्ठ मासो	जुन (June)	जेष्ट
७) आसाळह मासो	जुलै (July)	आषाढ
८) सावणो मासो	आगष्ट (August)	श्रावण
९) पोठ्ठपाद मासो	सप्टेंबर (September)	भाद्रपद
१०) अस्सयुजो मासो	आक्टोबर (October)	आस्विन
११) कतिको मासो	नोव्हेंबर (November)	कार्तिक
१२) मग्गसिरो मासो	डिसेंबर (December)	मार्गशिस

१) चन्दवारो	मंडे (Monday)	सोमवार
२) कुंजवारो	चुसडे (Tuesday)	मंगळवार
३) बुधवारो	वेणसडे (Wednesday)	बुधवार
४) गरुवारो	थर्सडे (Thursday)	गुरुवार
५) सुक्कवारो	फ्रायडे (Friday)	शुक्रवार
६) सनिवारो	सॅटरडे (Saturday)	शनिवार
७) आदिच्चवारो	संडे (Sunday)	रविवार

☸☸🦚🦚🦚*🌹🌹 बोधिसत्त्व बाबासाहेबांनी सांगितलेल्या प्रमाणे वागणे म्हणजेच प्रत्यक्ष त्यांचा सन्मान करणे होय...*

रविवार हा दिवस सुट्टीचा दिवस असला तरी आपण बौद्धांचा तो "धम्मदिन" आहे. त्यामुळे या दिवशी सर्व बौद्धांनी पहाटे लवकर उठून आपले घर आंगन स्वच्छ करावे.

आपापल्या सोयीनुसार एक वेळ निश्चित करून बुध्द व बाबासाहेबांच्या प्रतिमेला फुले अर्पण करावी, मेणबत्ती प्रज्वलीत करून मग कुटूंबासह त्रिसरण पंचशील ग्रहण करावे. त्यानंतर "बुध्द आणि त्यांचा धम्म" या पवित्र धम्मग्रंथाचे वाचन करावे. अर्थातच या दिवशी घरात धार्मिक वातावरण ठेवण्याचा प्रयत्न करावा.

जवळच्या विहारात भिक्षु किंवा शीलवान प्रचारक धम्मप्रवचन करणार असतील तर तिथे आवर्जुन कुटूंबासह सहभागी होण्याचा प्रयत्न करावा.

मुख्य म्हणजे, या दिवशी बौद्धांनी मांसाहार अजिबात करू नये, मद्यपान पुर्णतः वर्ज्य करावे व उपोसथ अष्टशील ग्रहण करावे.

याप्रमाणे सर्व बौध्द जेव्हा ही परंपरा कायम करतील तेव्हाच कुठे बोधिसत्त्व बाबासाहेबांना अपेक्षित असलेला आदर्श बौध्द समाज निर्माण होईल.

🙏नमो बुध्दाय जयभीम🙏

☸☸🌕🌕🔵🔵🔵 पौर्णिमा विशेष 🔵🔵🔵🌕🌕☸☸

☸☸🔵🔵🔵 पौष पौर्मिमा (फुस्स मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

पौष पौर्णिमेला पाली भाषेत 'फुस्समासो' म्हणतात. ही पौर्णिमा साधारणतः जानेवारी महिन्यात येते. या पौर्णिमेला भगवान बुद्धाच्या जीवनातील काही घटना घडल्यात. उदा. भगवान बुद्धाची राजगृहाला भेट, राजा बिंबिसाराची धम्मदीक्षा, श्रीलंकेत पौर्णिमेचे महत्त्व, चैत्यपूजेचे महत्त्व. या पौर्णिमेला ज्या घटना घडल्यात, त्यांचा संक्षिप्तपणे परिचय असा.

१) भगवान बुद्धाची राजगृहाला भेट २) राजा बिंबिसाराची धम्मदीक्षा ३) महाराणी खेमा यांची धम्मदीक्षा ४) स्तूपाची पूजा.

तथागत बुद्धांचा उपदेश ज्या ज्या राजांनी ऐकला ज्यांनी उपदेशाप्रमाणे आचरण केले त्यांचे कल्याण झाले, ते राजे तथागत बुद्धांच्या इतिहासाबरोबरच अमर झाले, एक दुसऱ्यापासून प्रेरणा घेतली ते तथागत बुद्धांचे अनुयायी झाले.

मगध देशाचा राजा बिंबिसार सिद्धार्थ गौतमाचा समकालीन राजा होता. मगध देशाची राजधानी राजगृह नगरी होती. राजा बिंबिसार यांच्या तीन राण्या १. कोसला देवी २. चलना देवी ३. खेमा राणी होय.

सिद्धार्थ गौतमाने आषाढी पौर्णिमेला कपिलवस्तू नगरीतिल भारद्वाज ऋषीच्या आश्रमात प्रवज्जा घेतली. कपिलवस्तू नगरी पासून ४०० मैल दूर असलेल्या राजगृह नगरीत प्रवेश केला आणि पांडव टेकडीच्या पायथ्याशी झोपडी बांधून राहू लागला व राहगृह नगरीत भिक्षाटनाला जाऊ लागला. तेव्हा नगरीतील लोक त्यांच्याकडे कुतूहलाने पाहू लागले हा तरुण देखणा असतांना संन्यासी का झाला असावा?

राजा बिंबिसाराणे ही बातमी ऐकली तेव्हा त्याने त्याची चौकशी करून माहिती मिळविली, कपिलवस्तू नगरी राजा शुद्धोधनाचा पुत्र सिद्धार्थ गौतम आहे. तेव्हा राजाने त्याची भेट घेतली आणि त्याच मन वळविण्याचा प्रयत्न केला आपले अर्धे राज्य देऊ केले, राज्याचे सुधारक अधिकारी पद देण्याची ग्वाही दिली, मात्र शिद्धार्थ गौतमाने ऐकले नाही. मला राजपदाची आशा नाही. मला माणस-माणसांत वैरभावना का ठेवतात? एक दुसऱ्याशी युद्ध करून रक्तपात का करतात? याचे कारण शोधायचे आहे, ज्ञान प्राप्त करण्यासाठी मी गृहत्याग केला आहे. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर आपण राजगृह नगरीला भेट द्यावी अशी विनंती केली. ही राजा बिंबिसार आणि सिद्धार्थ गौतमाची पहिली भेट होती.

तथागत बुद्ध ज्ञान प्राप्त झाल्यानंतर आपल्या धम्माच्या तत्वज्ञानाचा प्रसार करीत असतांना भिक्षु संघाबरोबर राजगृह नरीतील जेटवनात राहत होते. राजगृह नगरीचा राजा बिंबिसाराने तथागतांना वंदन केले आणि त्यांच्या बाजूला बसला, तथागतांचे प्रभावी प्रवचन ऐकून राजा बिंबिसार प्रभावित झाला. तथागत बुद्धांनी राजा बिंबिसाराला उपासकाची धम्मदीक्षा दिली. राजा बिंबीसाराने तथागतांना आणि त्यांच्या भिक्षु संघाला भोजनाचे निमंत्रण देऊन स्वादिष्ट भोजन दिले. तथागतांनी उपासकांना धम्म उपदेश केला. राजा बिंबिसाराने वेळुवन दान दिले, तेथे भव्य चैत्य स्तूप बांधण्याचा संकल्प केला.

बिंबिसार राजाची राणी खेमा फार सुंदर होती, तिला आपल्या सौंदर्याचा गर्व होता, ती तथागत बुद्धांच्या प्रवचनाला व दर्शनाला जात नव्हती. राजाला वाटत होते, खेमा राणीने तथागत बुद्धांच्या दर्शनाला जावे, तीने उपदेश ऐकावा, खेमा राणी तयार होत नव्हती, राजाने तथागत बुद्धांच्या गुणांवर, रूपांवर काही कलावंत बोलावून गिते गायला लावली, तथागत बुद्ध इतके बिद्धिवान, गुणवान सौंदर्यसंपन्न आहेत का? तेव्हा ती तथागत बुद्धांच्या दर्शनाला तयार झाली.

राजाने राणीसाठी मेनापालखी, दसदासी दिल्या. खेमा राणी तथागत बुद्धांचे प्रवचन ऐकून प्रभावित झाली. तीने तथागत बुद्धांच्या धम्माला अनुसरले, पुढे तीने धम्मप्रसारासाठी भिक्षुनी होण्यासाठी राजकडे विनंती केली. राजाने परवानगी दिली आणि ती भिक्षुनी झाली. ती पुढे प्रज्ञावान व्यक्ती म्हणून प्रसिद्ध पावली, राजा बिंबिसाराणे दरवर्षी पौश पौर्णिमेला राजमहोत्सव साजरा करण्याचे आदेश दिले. त्यानंतर धम्म प्रचार आणि प्रसारासाठी आपली धनदौलत त्यांनी खर्च घालून धम्माला राजश्रय दिला.

☸☸🌕🌕🔵🔵🔵🙏**माघ पौर्णिमा (माघ मासो पुंन्नमि)**🙏🔵🔵🔵🌕🌕☸☸

आज ५ फेब्रुवारी २०२३ रोजी *"माघ पौर्णिमा"* आहे.. यालाच पाली भाषेत (माघो मासो) असेही म्हणतात.

ही पौर्णिमा साधारणतः फेब्रुवारी महिन्यात येते. माघ पौर्णिमेला बुद्धाच्या जीवननात काही महत्वपूर्ण घटना घडल्यात.

----

१) पहिली घटना: *वैशाली येथे तथागतांच्या धातू अवशेषावर बांधलेला स्तूप सापडला.* २) दुसरी घटना: *बुद्धाची महापरिनिब्बाणाची घोषणा.* ३) तिसरी घटना: *भगवंताच्या भिक्षापात्राची भेट.* ४) चौथी घटना: *वैशालीचे अंतिम दर्शन.* ५) पाचवी घटना: *आनंद श्रमणाचे परिणीब्बाण.*

पहिली घटना:– *विहाराचा शोध* वैशाली नगरीत *माघ पौर्णिमेला* अति महत्वाच्या तीन घटना घडलेल्या आहेत. बिहार राज्यातील वैशाली या ठिकाणी भगवंताच्या धातू अवशेषावर बांधलेला एक स्तुप सापडला तो माघ पौर्णिमेलाच. वैशाली मुक्कामी बुध्दांनी आपल्या अंतिम समयी केलेल्या घोषणेस वैशालीवासी व सर्व बौद्ध जनता कदापिही विसरणे शक्य नाही. भगवंताच्या जीवनात व माघ पौर्णिमेस मोठे भावनिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. भगवंतानी येथे केलेल्या घोषणेमुळे वैशालीनगरी अजरामर झाली. बौद्ध साहित्यातील प्रमुख ग्रंथामध्ये वैशाली नगरीचा उल्लेख महत्त्वाच्या ऐतिहासिक गाथा आणि परंपराच्या संदर्भात अनेक वेळा आढळून येतो. आम्रपाली.. वैशालीचीच.. महा प्रजापती गौतमीसह ५०० महिलांना प्रथम दिक्षादिली वैशालीतच.. वैशालीच्या गणतंत्र. पध्दतीवरुन भगवंतानी भिक्खू संघाची रचना केली. द्वितीय संगीती संपन्न झाली. वैशालीतीच... आपल्या जीवनातील दोन वर्षावास (५ वा आणि ४६ वा तथा अंतिम) भगवंतानी या वैशालीतच पूर्ण केले..*

१. 🔹 *वैशाली येथे तथागतांच्या धातू अवशेषावर बांधलेला स्तूप सापडला.*

भगवंताच्या महारीनिब्बाणानंतर कुशीनगर येथे पवित्र धातू अवशेषांची समान आठ भागांत वाटणी करण्यात आली. त्यापैकी एक वाटणी वैशालीचे लिच्छवी यांनाही प्राप्त झाली. त्यावर त्यांनी एक स्तूप बांधला. चिनी प्रवासी हुआनत्सांग यांच्या प्रवास वर्णणावरून मार्च १८५८ मधे श्री. अनंत सदाशिव आल्हेटकर यांनी हा स्तूप शोधून काढला. त्यापूर्वी तो मातीच्या ढिगाऱ्याखाली लपलेला होता. भाजलेल्या विटांनी बनविलेला हा साधा स्तूप होता. स्तूपाच्या आत भगवंताच्या पवित्र धातू ठेवलेला एक कुंभ मिळाला.

२. 🔹 *बुद्धांच्या महापरिनिब्बाणाची घोषणा.*

भगवान तथागतांनी ऐंशीव्या (८०) वर्षात पदार्पण केले. शरीर थकले आणि क्षीण झाले. वैशाली येथील चापाल विहारात आराम करित असतांना भगवंतांनी आपला प्रिय शिष्य आनंद यांस जवळ बोलावून म्हणाले, हे आनंद!!! तथागत आजपासून तीन महिन्यांनी म्हणजे वैशाखी पौर्णिमेस महापरिनिब्बाण पावतील. तो दिवस होता इ. स. पूर्व ४८४ च्या माघ पौर्णिमेचा होता. भगवंतांनी घोषित केल्याप्रमाने वयाच्या ८० व्या वर्षी उत्तररात्री रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी वैशाख पौर्णिमेस कुशिनगर येथे भगवान बुद्धांचे शाल वृक्षाखाली महापरिनिब्बाण झाले.

३. 🔹 *भगवंताच्या भिक्षापात्राची भेट.*

तथागतांनी त्यांच्या महापरिनिब्बाणाच्या घोषणेच्या दुसऱ्या दिवसी वैशाली येथील त्यांच्या शेवटच्या चारिकेनंतर शहराच्या बाहेर निघायला लागले, तेव्हा, त्यांच्या मागेमागे सर्व लिच्छवी दु:खी मनाने शराबाहेर चालत आले. त्यांना तथागतांनी मनाई करुनही ते ऐकत नव्हते व मागेमागे चालत राहिले. लिच्छविंचा स्नेह, प्रेम व आदर बघून लिच्छविंजवळ आपली कोणतीतरी स्मृती रहावी म्हणून त्यांनी त्यांच्याजवळील भिक्षापात्र (चारिकापात्र) लिच्छविंना दानस्वरूप दिले. ही घटना लिच्छविंनी शिलालेखावर लिहून ठेवली आहे.

केसरिया:- बिहारच्या पटणा पासून १०५ किमी. अंतरावर व चंपारण जिल्ह्यात असलेले १०४" उंच हा स्तूप विश्वातीला सर्वात उंच स्टुपामध्ये एक आहे. सन १९८८ मधे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण द्वारे खोदकामात याचे अस्तित्वाला दुनियेच्या समोर आणल्या गेले. असी मान्यता आहे की, बुद्ध जेव्हा वैशालिहून केसरियासाठी निरोप घेत होते तेव्हा वैशालीच्या लोकांना भिक्षापात्र दानात दिले होते. यानंतर या भिक्षापात्राला वैशालीच्या मठात ठेवल्या गेले जेथे शेतकरी आणि फळ व्यापारी आपली शेतीतील मिळकत कापल्यानंतर सर्वप्रथम या पात्राला समर्पित (वाहत) करीत होते.

४. 🔹 *वैशालीचे अंतिम दर्शन.*

भगवान बुद्ध राजगृही गृद्धकूट पर्वतावर राहत होते. तिथेंबकाही काळ वास्तव्य केल्यानंतर अंबलठ्ठिकेला जाण्यासाठी निघाले. नालंदा पाटलीग्राम, कोटीग्राम, नादीकेहून भगवंत वैशालीला गेले. वैशालीला दुष्काळ पडला होता. त्या कालखंडात वैशालीच्या लोकांनी भगवान तथागतास निमंत्रण दिले. त्यांचे निमंत्रण स्वीकारून भगवंत नगरात आले. योगायोग असा कि, नैसर्गिक वातावरणात ढगाळ परिस्थिती निर्माण झाली आणि पाऊस सुरु झाला व दुष्काळ संपला. आणि शेवटी वैशालीला गेले. प्रत्येक ठिकाणी तथागत थांबले आणि उपदेश दिला. तथागत वैशालीला पोहोचल्यानंतर म्हणाले, ही माझी वैशाली नगरीची अंतिम भेट असणार आहे. ही वार्ता संपूर्ण वैशालीत वाऱ्यासारखी पसरली. वैशालीतील सर्व लोक दु:खी, खिन्न, व्यथित झाले. भोजन केल्यानंतर तथागतांनी आनंदासह कुसुमावती नदीच्या घाटावरील उंच ठिकाणी चढून संपूर्ण वैशालीचे दर्शन घेतले. वैशालीचे दर्शन घेऊन कायमचे सोडून जाण्यास निघाले. वैशालिला सोडतांना वारंवार मागे वळून बघत होते. एवढे प्रेम तथागतांचे वैशालीवर होते.

५. 🔹 *आनंद श्रमणाचे परिणीब्बाण.*

तथागतांप्रमाणेच स्थवीर आनंदालासुद्धा आपले परिणीब्बाण समीप आल्याचे आधीच समजले. त्यांनासुद्धा वाटले की आपले परिणीब्बाण वैशालीतच व्हावे. आनंदसुद्धा राजगृह सोडून वैशालीला जाण्यास निघाले. वैशालीला स्थविर आनंद येत असल्याची वार्ता कळतांच, लिच्छवी स्वागतास तयार होते. परंतु स्थविर आनंदास वाटले की वैशालीस गेलो तर राजा अजादशत्रू यास वाईट वाटेल आणि माघारी गेलो तर लिच्छवी नाराज होणार. यावर उपाय म्हणून पाच नदीचा संगम असणाऱ्या नदीच्या मध्यभागी गेले व त्या नदीच्या मध्यभागी जाऊन परिणीब्बाण प्राप्त केले. परिणीब्बाण वेळी त्यांचे वय १२० वर्षे होते. मगध नरेश अजादशत्रू व वैशालीचे लिच्छवी या दोघांनी स्थविर आनंदाचा अंत्यविधी गंडकी नदी किनारी पार पाडला. आनंदाच्या अस्थी अवशेषाचे समान दोन भाग करण्यात आले. एक भाग मगधाकडे तर दुसरा भाग वैशाली राजांनी घेतला. दोन्ही राजांनी अस्थी अवशेष आपल्या राज्यात नेऊन त्यावर स्तूप उभारले. लिच्छविंनी उभारलेला स्तूप वैशालीस आजही पाहावयास मिळतो. सम्राट अशोकांनी पुढे त्याचे पक्क्या विटांचा वापर करून या अर्धांगावशेष स्तूपाचे पुणरुज्जीवन केले. अशोक स्तंभाच्या बाजूला आजही आहे. या स्तूपाच्या उत्खननात अस्थी रक्षेबरोबर पुढील वस्तू आढळून आल्यात. एक कवडी, काचेचे अमूल्यमणी, सोन्याच्या पुतळ्या, तांब्याची आहत मुद्रा, रत्नजडीत विटा, किरीटयुक्त वानराची मृण्मयी मूर्ती या बाबी विशेष उल्लेखनीय आहेत.

"पौर्णिमेचे महत्व"

१. सणांच्या दिवशी मंगल, सुखी व आनंदी जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित करणाऱ्या भूतकाळामध्ये घडलेल्या घटनांची स्मृती जपण्यासाठी सण साजरे केले जातात.

२. सणांच्या दिवशीच्या भूतकाळातील घडामोडीपासून बोध घेऊन त्यानुसार स्वतःचे जीवन घडविण्यासाठी सण साजरे केले जातात.

३. बुद्धाने आयुष्यभर शील, समाधी व प्रज्ञेचा मार्ग शिकविला. त्याने करुणा विकसित करण्याचा व समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला. त्यामुळे प्रत्येक बुद्ध सणाच्या दिवशी शीलांचे काटेकोरपणे पालन करणे व काया, वाचा व मनाची आपली कृती निष्कलंक व कुशल राहील याची खबरदारी घेणे निकडीचे आहे. सर्व सणांच्या दिवशी प्रत्येकाचे वर्तन हे बुद्धाच्या शिकवणुकीशी सुसंगत असेच असले पाहिजे.

४. या दिवशी धम्मप्रवचने, परिषदा, कार्यशाळा वेगवेगळ्या भागांमध्ये आयोजित केल्या पाहिजेत आणि लोकांनी धम्म शिकण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे, जेणेकरून ते स्वतःच्या व इतरांच्या कल्याणासाठी धम्मानुचरण करतील.

५. सर्व बारा पौर्णिमा बौद्धांचे सण आहेत. सिद्धार्थ गौतम बुद्धांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना पौर्णिमेच्या दिवशी घडलेल्या आहेत. बुद्ध धम्मात प्रत्येक पौर्णिमेला वेगळे असे महत्व आहे.

६. या सर्व दिवशी उपोसथ म्हणजेच अष्टशीलाचे गांभीर्याने पालन केले पाहिजे. जेव्हा आपण प्रसन्नतेने अष्टशीलाचे पालन करतो, तेव्हा भूतकाळात त्या दिवशी घडलेल्या महत्वाच्या घटना या शील व समाधीचा जास्तीत जास्त धैर्याने अभ्यास करण्याची प्रेरणा आपल्याला देत असतात.

७. त्यामुळे प्रत्येक पौर्णिमेचे ऐतिहासिक महत्व समजून घेणे आवश्यकआहे.

(संदर्भ: *बोधिसत्त्व आंबेडकरांचे बुद्ध धम्म मिशन: श्याम तागडे, आय.ए.एस.)

माघ पौर्णिमेच्या सर्व उपासक ऊपासिकांना मन:पुर्वक मंगल कामना! *पौर्णिमा एक उपोसथदिन*

🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏

हा जागृतीचा विस्तव विझु देवू नका!

🌷🌷बोधीसत्व बाबासाहेब🌷🌷

🔥🔥🔥🔥🔥🔥🔥🔥🔥🔥

|| भवतु सब्ब मंगलं || *सर्वांचे मंगल होवो!*

माघ पौर्णिमेच्या मंगलमय *शुभेच्छा!* 🌹🍀🌷🍀🌸🍀🌺🍀

☸☸🔵🔵🔵*"फाल्गुन पौर्णिमा" 'फग्गुणो मासो पुन्नमि'*🔵🔵🔵☸☸

----

१) पहिली घटना: बुद्धत्व प्राप्तीनंतर कपिलवस्तूला पहिली भेट. २) दुसरी घटना: यशोधरा व बुद्धांची भेट आणि राहुल याची श्रामणेर दिक्षा. ३) तिसरी घटना: तथागतांचा पूर्वाश्रमीचा सावत्रभाऊ नंद याने हट्ट केल्याने तात्पूर्ती प्रवज्जा दिली. ४) चौथि घटना: माता महाप्रजापति गौतमी यांनी तथागतांना शाल वृक्ष रोप दान दिले. ५) पाचवी घटना: पुष्यमित्राने बौद्धांचा राजा बृहद्रथाची हत्या केली.

बोधीसत्व सिद्धार्थ गौतमाच्या गृहत्यागाला सात वर्षे होऊन गेली. शुद्धोधन राजाला आपल्या मुलाविषयी सविस्तर माहिती अजूनही निट समजली नव्हती. परंतु सिद्धार्थ गौतम सम्यक सम्बुद्ध झाले असून त्यांनी भिक्षु संघाची प्रस्थापना केली. तो संघाचा आणि जगाचाही शास्ता झाला आहे. सध्या सम्यक सम्बुद्ध बिंबिसार राजाने दान दिलेल्या वेळूवन विहारात रहात आहेत.

हि वार्ता शुद्धोधनाला समजली. राजाने एका राजदूताला भगवान बुद्धाकडे त्यांना कपिलवस्तुला घेऊन येण्यासाठी पाठविले. तो भगवान बुद्धाकडे गेला आणि पुन्हा परत आला नाही. तो भिक्षु झाला. राजाने पुन्हा दोन-तीन दूतांना पाठविले. पण ते सुद्धा भिक्षु झाले.

भगवंत राजगृहात राहत असल्याचे ऐकल्यावर राजा शुध्दोधनाने निरोप पाठविला की, "मरण्यापूर्वी माझ्या मुलाला पाहण्याची इच्छा आहे. त्याच्या उपदेशाचा फायदा इतरांना मिळाला परंतु त्याच्या पित्याला अथवा त्याच्या नातलगांना मिळालेला नाही." बोधीसत्व सिद्धार्थ गौतमाच्या बालमित्राला राजाने भगवान बुद्धाला निमंत्रण देण्यासाठी पाठविले. कालुदायी राजगृहाला आला तेव्हा भगवान बुद्ध वेळूवनात रहात होते, तेथे तो गेला. परंतु भगवंतांचे प्रवचन ऐकून तोही शिष्य झाला. भिक्षु झाला आणि भगवान बुद्धाला

त्यांच्या शिष्यगणांच्या सह कपिलवस्तुला घेऊन आला.

कालुदायीच्या विनंतीला भगवान तथागतांनी मान दिला. शाक्यांनी निर्माण केलेल्या न्यग्रोध विहारात भगवान बुद्ध राहिले. कपिलवस्तुतील जनतेला अनेकवेळा उपदेश केला. एकदा भिक्षा मागत भगवान बुद्ध शुद्धोदनाच्या वाड्यात गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी भगवान बुध्द आपले भिक्षापात्र घेऊन कपिलवस्तूमध्ये भिक्षेसाठी निघाले. ही विचित्र वार्ता ऐकून शुध्दोधन त्वरित निघाले आणि भगवंताला म्हणाले, "तू माझ्या नावाला काळिमा का फासतोस? तुला व तुझ्या भिक्खूंना मी सहज अन्न पुरवू शकेन हे तुला माहीत नाही काय?"

भगवंत म्हणाले, "ही माझ्या संघाची प्रथा आहे." पण हे कसे शक्य आहे, असे शुध्दोधनाने विचारताच भगवंत म्हणाले,

"आपण राजाचे वंशच आहोत असे तुम्ही व तुमच्या वंशियांनी वाटल्यास तसे म्हणावे, परंतु मी प्राचीन #बुद्धाचा_वंशज आहे ते आपले अन्न मागून मिळवित असत आणि भिक्षेवरच ते आपला निर्वाह करीत असत."

शुध्दोधन निरुत्तर झाला. तेव्हा तथागत पुढे म्हणाले, "जर आपण आपल्या स्वप्नातून मुक्त व्हाल आपले अंतःकरण सत्यासाठी उघडे कराल, आपण सदाचाराचा उत्साह बाळगाल आणि सतधम्माचा मार्ग स्वीकारला तर आपल्याला शाश्वत असा आनंद लाभेल."

शुध्दोधनाने हे सर्व शांतपणे ऐकले व म्हणाले, "बाळ तु जे म्हणतोस त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करीन."

आपल्या सर्व नातलगांना व मित्रांना भेटल्यावर भगवंतांनी विचारले, "यशोधरा कुठे आहे?" आणि तिने येण्याचे नाकारले हे समजल्यावर ते उठले आणि तडक तिच्या दालनात गेले.

यशोधरा आपल्या दालनात विचारमग्न स्थितीत बसली होती. भगवंतांनी प्रवेश करताच ती काठोकाठ भरुन वाहणाऱ्या पाण्याच्या पात्राप्रमाणे ती इतकी प्रेमनिर्भर झाली की तिला स्वतःला सावरणे शक्य झाले नाही.

ज्याच्यावर आपण प्रेम केले तो पुरुष सत्याची शिकवण देणारा जगतवंदनीय भगवान बुध्द आहे हे ही विसरून गेली. तिने त्यांचे पाय धरले व ती एकसारखी रडू लागली.

तिचे दु:ख शब्दातीत होते. तिच्या जीवनातील उदात्त वृत्तीमुळे तिच्या आध्यात्मिक पुण्याईच्या किर्तीत भर पडली होती आणि तिला अद्वितीय व्यक्तीमत्व प्राप्त झाले होते.

यशोधराने ७ वर्षे वयाच्या राहुलला राजकुमाराच्या वैभवाला साजेसे कपडे घातले आणि ति त्याला म्हणाली, "३२ लक्षणे ८० शुभ चिन्ह ज्यांच्या शरीरात आहे व महान सूर्याप्रमाणे दिसणारा तेजस्वी चेहऱ्याचा हा सत्पुरुष तुझा पिता आहे. मी अजूनही पाहिल्या नाही. अशा द्रव्याच्या मोठमोठ्या खाणी त्यांच्याजवळ आहेत. त्यांच्याकडे जा आणि ति संपत्ती तुझ्या ताब्यात देण्याविषयी त्यांना विनंती कर. कारण पित्याची मालमत्ता वारसाहक्काने पुत्राकडे आली पाहिजे."

राहुल भगवंताकडे गेला आणि त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून निर्भयपणे आणि प्रेमाने म्हणाला, "श्रमणा आपली छाया सुखद आहे." भगवंत शांतच राहिले. राहुल आपला वारसाहक्क त्यांना मागू लागला, "बाबा, मला माझा वारसा हक्क द्या! दाय्यभाग द्या!"

सारिपुत्ताकडे वळून भगवंत म्हणाले, "माझा पुत्र आपला वारसा मागतो आहे. चिंता आणि दुःख उत्पन्न करणारे नाशवंत असे धन मी त्याला देऊ शकत नाही. परंतु ज्याचा कधीही क्षय होणार नाही अशा पवित्र जीवनरूपी धनाचा वारसा मात्र मी त्याला देऊ शकतो."

राहुलला उद्देशून अत्यंत आस्थेने तथागत म्हणाले, "सोने, रुपे आणि रत्ने यापैकी माझ्याजवळ काहीही नाही. परंतु आध्यात्मिक धन स्वीकारण्यास तु तयार असशील आणि ते वाहून नेण्याईतका व जतन करून ठेवण्याईतका तु समर्थ असशील टरबसले धन माझ्याकडे विपुल आहे. माझे आध्यात्मिक धन म्हणजे 'धम्माचा मार्ग' परमोच्य आनंदाच्या प्राप्तीसाठी मनाच्या संस्काराच्या साधनेला ज्यांनी आपले जीवन वाहिले आहे. अशांच्या संघात प्रवेश मिळावा असी तुझी इच्छा आहे काय?"

राहुलने निश्चयपुर्वक उत्तर दिले, "होय."

तथागत राहुलला आपले भिक्षापात्र देतात व भिक्खुसंघात सामील करून घेतात. श्रामणेर राहुल सुसंस्कृत होता. आज्ञाधारक होता. राहुलने ध्यानात प्राविण्य मिळविले पुढे त्याला अरहंत पद प्राप्त झाले.

भगवंताने सारीपुत्राला बोलावून घेतले आणि सांगितले की, हा राहुलकुमार माझ्याकडे वारसा मागत आहे. तेव्हा तु याला प्रवज्जा देऊन श्रामणेर कर. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी राहुलाला श्रामणेर दीक्षा दिली. भगवंतांनी याच पौर्णिमेच्या दिवशी कपिलवस्तुतील लोकांना शाक्यांना महासमय सुत्ताचा उपदेश केला व तथागातांचा सावत्र भाऊ म्हणजेच महाप्रजापती गौतामिचा पुत्र नंद याला सुद्धा फाल्गुन पौर्णिमेलाच श्रामणेर दीक्षा दिली.

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवसी बुद्ध कपिलवस्तुला गेले होते. त्यांचे स्वागत करण्यासाठी कपिलावस्तुतील शाक्यांनी सायंकाळाच्या वेळी मोठा उत्सव मनविला होता, ज्याला होलका असे म्हटले जाते.

शाक्यांनी भात शिजवून उत्सव मनविला ज्याला होलका म्हटल्या जाते. होलका मधे लाकडे जमा करून त्याच्या वरती भात शिजविल्या जातो.

बुद्धाला अग्नीच्या रूपात पुजल्या जाते. संयुक्त निकाय मधे बुद्ध म्हणतात की, "मी स्वतःच्या आत बुद्धत्वाचा अग्नी जळतो. ... मी स्वतः अग्नी आहे." (सं. नि. १.१६९) बुद्धांना ज्ञानाचा अग्नी (Fire of knowledge) म्हटल्या जाते (MKDJT, p. १५८८). ज्ञानाच्या प्रतिकाच्या रूपात बौद्ध शिल्पांमधे बुद्धांच्या शरीरातून अग्निज्वाळा निघतांना दाखविल्या जाते (Eliade, १९६५, p. ३४). ज्ञानाचा महामेरू बुद्धांना दर्शविण्यासाठी बुद्धाच्या डोक्यातून पण अग्नीच्या ज्वाळा निघतांना दाखविल्या जातात (Snellgrove,

१९७८, plates १५५, १६३, etc.).

याप्रकारे बुद्धांच्या ज्ञानाला अग्नीचे रूप मानल्या जाऊन प्राचीन बौद्ध लोक बुद्धांची अग्निदेव या रूपात पूजा करित होते. खालती स्तूपासारखा उंच चबुत्तरा बनवून त्याच्या वरती बांबूची एष्टि उभि केली जात होती आणि त्याची पूजा करून त्या एष्टिला जाळल्या जात होते. बांबूची एष्टि आणि त्याच्या वरती निघालेल्या तीन ज्वाळा त्रिरत्नाचे प्रतिक समजून लोक त्याची पूजा करीत होते व त्याची पवित्र राख बुद्धत्वाचे प्रतिक समजून आपल्या कपाळावर संमान:पूर्वक लावत होते, आणि या प्रकारे प्रत्येक वर्षी फाल्गुन पौर्णिमेला बौद्ध उत्सव मनवित होते. आजपण लोक खालती स्तूपासारखी उंची लाकडे ठेवून त्याच्या वरती त्रिरत्नाची बांबूची एष्टि ठेवतात आणि पूजा करून त्याला जाळतात. जाळणे वास्तवात बुधत्व व अनित्याचे प्रतिक आहे.

बुद्धत्व प्राप्तीनंतर बुद्धांची कपिलवस्तुला भेटीसाठी शाक्यांनी फाल्गुन पौर्णिमेच्या दिवसी होलका उत्सव मानविला होता.

तथागतांचा पूर्वाश्रमीचा सावत्रभाऊ नंद याने हट्ट केल्याने भंते सारिपुत्त व भंते महामोग्गलायन यांनी बाळ नंदाचे मुंडणं करून तात्पूर्ती प्रवज्जा दिली व भिक्षु संघात शामिल केले.

राजा शुद्धोधनाने तथागतांना असी विनंती केली की, इथून पुढे आजान, अल्पवयीन मुलांना प्रवज्जा देऊ नये? धम्म व संघ काय आहे याची त्यांना जाणीव झाली पाहिजे, ही विनंती तथागतांनी मान्य केली.

माता महाप्रजापति गौतमी यांनी तथागतांना शाल वृक्ष रोप दान दिले. सिद्धार्थ गौतमाचा जन्म ई. स. पूर्व ५६३ नेपाळ प्रांतात तराई मधे लुंबिनी नावाच्या प्रसिद्ध वनामध्ये दोन शाल वृक्षाच्या मधे झाला व तथागतांचे महापरिणिर्वान ई. स. पूर्व ४८३ कुशीनगर येथील शाल वनात दोन शाल वृक्षाच्या मधे झाले.

भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर दोन-अडीचशे वर्षांनी सम्राट अशोकाने बौद्ध धम्माला राजधम्म म्हणून घोषित केले आणि सर्व प्रकारच्या प्राण्यांच्या हत्येवर बंदी आणली.

ई.सं.पूर्व १८५ ला पुष्यमित्राने बौद्धांचा राजा बृहद्रथाची हत्या करून शुंग साम्राज्याची स्थापना केली. हि घटना फाल्गुन पौर्णिमेलाच घडली.

भारतीय संस्कृती हि मुळातच नाग संस्कृती होय. या संस्कृतीने पुढे बौद्ध संस्कृतीचे रूप धारण केले. नाग वंशीय साम्राज्याच्या मालिकेत सम्राट अशोकाचे साम्राज्य हे प्रमुख आणि वैभवशाली साम्राज्य म्हणून ओळखले जाते. ते बौद्ध संस्कृतीचे वैभवशाली प्रतिक म्हणून गणले जाते. सम्राट अशोकाच्या (ई .स. पूर्व २७४ ते २३२) साम्राज्यात महाराष्ट्राचा समावेश होत होता. याचा पुरावा सापडतो. सम्राट अशोकाच्या आठव्या आणि नवव्या धर्माज्ञेचे शिलालेख, शिलाखंड ठाणे जिल्ह्यातील सोपारा येथे सापडले आहेत. सोपारा हि मौर्यांची राजधानी होती.

नागपूरच्या भूमीत अशोका विजयादशमीच्या दिवशी १४ ऑक्टोबर, १९५६ ला धम्मदीक्षा समारंभात डॉ. बाबासाहेब म्हणाले होते की, भारतात बौद्ध धम्माचा प्रसार जर कोणी केला असेल, तर तो नाग लोकांनी केला. नाग लोक आर्यांचे भयंकर शत्रू हेते. आर्य व अनार्य यांच्यामुळे तुंबळ युद्धे झाली. आर्य लोकांनी नागांना जाळून टाकल्याचे दाखले, पुरावे सापडतात.

फाल्गुन पौर्णिमेला नागवंशीय बौद्धांच्या राजपुरुषांना जिवंत जाळले. आर्यांनी नागवंशीयांचा फार छळ केला. तसेच यज्ञ करून त्यात नागवंशीयांना जिवंत जाळले.

"पौर्णिमेचे महत्व"

१. सणांच्या दिवशी मंगल, सुखी व आनंदी जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित करणाऱ्या भूतकाळामध्ये घडलेल्या घटनांची स्मृती जपण्यासाठी सण साजरे केले जातात.

२. सणांच्या दिवशीच्या भूतकाळातील घडामोडीपासून बोध घेऊन त्यानुसार स्वतःचे जीवन घडविण्यासाठी सण साजरे केले जातात.

३. बुद्धाने आयुष्यभर शील, समाधी व प्रज्ञेचा मार्ग शिकविला. त्याने करुणा विकसित करण्याचा व समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला. त्यामुळे प्रत्येक बुद्ध सणाच्या दिवशी शीलांचे काटेकोरपणे पालन करणे व काया, वाचा व मनाची आपली कृती निष्कलंक व कुशल राहील याची खबरदारी घेणे निकडीचे आहे. सर्व सणांच्या दिवशी प्रत्येकाचे वर्तन हे बुद्धाच्या शिकवणुकीशी सुसंगत असेच असले पाहिजे.

४. या दिवशी धम्मप्रवचने, परिषदा, कार्यशाळा वेगवेगळ्या भागांमध्ये आयोजित केल्या पाहिजेत आणि लोकांनी धम्म शिकण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे, जेणेकरून ते स्वतःच्या व इतरांच्या कल्याणासाठी धम्मानुचरण करतील.

५. सर्व बारा पौर्णिमा बौद्धांचे सण आहेत. सिद्धार्थ गौतम बुद्धांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना पौर्णिमेच्या दिवशी घडलेल्या आहेत. बुद्ध धम्मात प्रत्येक पौर्णिमेला वेगळे असे महत्व आहे.

६. या सर्व दिवशी उपोसथ म्हणजेच अष्टशीलाचे गांभीर्याने पालन केले पाहिजे. जेव्हा आपण प्रसन्नतेने अष्टशीलाचे पालन करतो, तेव्हा भूतकाळात त्या दिवशी घडलेल्या महत्वाच्या घटना या शील व समाधीचा जास्तीत जास्त धैर्याने अभ्यास करण्याची प्रेरणा आपल्याला देत असतात.

७. त्यामुळे प्रत्येक पौर्णिमेचे ऐतिहासिक महत्व समजून घेणे आवश्यकआहे.

(संदर्भ: *बोधिसत्त्व आंबेडकरांचे बुद्ध धम्म मिशन: श्याम तागडे, आय.ए.एस.)

फाल्गुन पौर्णिमेच्या सर्व उपासक ऊपासिकांना मन:पुर्वक मंगल कामना! *पौर्णिमा एक उपोसथदिन*

🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏

हा जागृतीचा विस्तव विझु देवू नका!

🌷🌷बोधीसत्व बाबासाहेब🌷🌷

🔥🔥🔥🔥🔥🔥🔥🔥🔥🔥

! जय भिम ! !! जय भारत !!! नमो बुद्धाय !!!

☸☸🔵🔵🔵 "चैत्र पौर्णिमा" (चेत मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

#चैत्र पौर्णिमेचे महत्व

उरुवेला प्रदेशात सेनानी नावाचा श्रीमंत राहत होता. ज्या गावात तो राहत होता त्या गावाला सेनानीग्राम नाव पडले. त्याला सुजाता नावाची सुस्वरूप मुलगी होती. योग्य पती मिळावा आणि प्रथम पुत्ररत्नाचा लाभ व्हावा म्हणून सुजाताने देवतेला दुधाचा पायस प्रदान करून सत्काराने पूजा करीन असा कुमारी अवस्थेत अविवाहित असतांनाच तिने प्रयास केला होता. योगायोगाने सुजाताला मनपसंत पति मिळाला आणि प्रथम पुत्ररत्नाचा लाभ झाला. सुजाताला अतिशय आनंद झाला. तिने दासीला वनामध्ये वडाच्या झाडाखाली स्वच्छता करण्यास पाठविले. तिने स्वतः दुधाची उत्तम खीर बनविली. बोधिसत्व सिद्धार्थ गौतम आपली तपश्चर्या बंद करून सेनानी गावाच्या बाहेर वडाच्या झाडाखाली येवून ध्यानस्थ बसले. बोधीसत्व सिद्धार्थ गौतमाची ध्यान भावनेत बसलेली गंभीर व प्रसन्न मुद्रा दासीने पहिली. अशी गंभीर व प्रसन्न मूर्ती पाहिली तेव्हा तिला वाटले कि, सुजाताची पूजा स्वीकारण्यासाठी साक्षात देवताच त्या वृक्षाच्या खाली येवून बसली आहे.

ति दासी तशीच धावत सुजाताजवळ गेली आणि सुजाताला सांगू लागली, दुधाचा पायस आणि पूजा घेऊन आपण लवकर तेथे जाऊ आणि देवतेची पूजा करू. सुजाताने दासिजवळ पूजा साहित्य दिले आणि स्वतः सोन्याच्या ताटात दुधाची खीर घेतली आणि दोघेजणी वडाच्या झाडाखाली आल्या. तेव्हा बोधिसत्वाला तेथे पाहून सुजाताला अतिशय आनंद झाला. हि वनदेवता आहे, अशी तिची खात्री झाली. सुजाताने खिरीने भरलेले ताट बोधीसत्वाच्या समोर ठेवले. त्यांना प्रदक्षिणा आणि वंदन करून ति एका बाजूला उभी राहिली. काही वेळाने बोधिसत्व ध्यानातून उठले. त्यांनी डोळे उघडून त्यांच्याकडे पाहिले. सुजाताने पहिले कि, वनदेवता नसून कोणीतरी महान तपस्वी असावा. हि गोष्ट सुजाताच्या लक्षात आली.

ति बोधीस्तावला म्हणाली, "हे सत्पुरुषा! आम्ही वनदेवतेची पूजा करण्यासाठी येथे आलो आहोत. आज चैत्र पौर्णिमेचा दिवस आहे. हा खिरीचा पदार्थ आपणास प्रदान करीत आहोत. याचा स्वीकार करावा, अशी मी विनंती करीत आहे.

बोधीसत्वाने ते अन्न स्वीकारले व निरंजना नदीच्या सुप्पतिठ्ठ नावाच्या घाटावर जाऊन स्नान केले. रिकामे ताट नदीच्या पात्रात सोडून दिले या घटनेवरून चैत्र पौर्णिमेला विशेष महत्व संपूर्ण बौद्ध जगतात प्राप्त झाले आहे.

"सर्व बौद्ध उपासक/उपसिकांना पौर्णिमेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा."

! जयभीम ! !! जय भारत !! !!! नमो बुद्धाय !!!🙏

☸☸🔵🔵🔵 चैत्र पौर्णिमा (चेत मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

सुजाताचे तथागत भगवान बुद्धांना खीर दान

"चैत्र पौर्णिमा" ही बौद्ध समूहाचा सण व मंगल दिवस आहे. मराठी महिन्यांप्रमाणे ही पहिली पौर्णिमा होया. या पौर्णिमेला बौद्ध धम्मात अणण्यासाधारण महत्व आहे. रोहिणी नदीच्या पाणी वाटपाच्या भांडणावरून शाक्य आणि कोलीय यांच्यात सारखे भांडणे होऊ लागली. शाक्य संघाने कोलियांबरोबर युद्ध करण्याचे ठरविले. संघाच्या निर्णयाविरुद्ध सिद्धार्थ गेला. एकमताने युद्ध करण्याचे ठरविले होते. परंतु सिद्धार्थ गौतमाने युद्धाला नकार दिला. मात्र त्याच्या मताला कोणीही सहमत झाले नाही. आणि संघाने शिक्षा केल्यावरून वयाच्या 29 व्या वर्षी आषाढी पौर्णिमेला सिद्धार्थ गौतमाने आपल्या सर्व ऐश्वर्याचा, परिवाराचा त्याग करून प्रवज्या घेतली. वेगवेगळ्या ऋषींच्या आश्रमात ज्ञान संपादन करीत असता सहा वर्षे लोटून गेली. मिळालेल्या ज्ञानाने त्याचे समाधान झाले नाही. शेवटी उरवेला येथे खडतर तपश्या करायची ठरवून डोंगर दरीत, झाडीत उपास तापास करू लागले. चार-चार सहा-सहा दिवस अन्न खात नव्हते. शरीर अस्थीपंजर झाले होते. असे करीत असता "डुंगेशवरी" नावाच्या पर्वताच्या एका गुहेत (कपारीत) बसून घोर तपाचरण करू लागले. शरीर क्षिण, अशक्त झाले होते. चालता येत नव्हते. एक दिवा वुठून चालले असता चक्कर येऊन पडले व शुद्धीवर आल्यावर त्यांनी ठरविले की, आपण अन्न ग्रहण केले तरच शरीर टिकेल नाहीतर मृत्यू आपल्याला गाठेल आणि म्हणून त्यांनी ठरविले की, अन्न ग्रहण करावे. जवळच नदीच्या काठी एक वटवृक्ष होता. त्याखाली ते बसले. या निरंजना नदीच्या काठी सिद्धार्थ बसलेले असताना एक विशेष अशी घटना घडून आली. या भागात सेनानी नावाचे गाव होते. त्या नगरीत सेनानी नावाचा एक श्रीमंत होता. त्याला एक सुजाता नावाची मुलगी होती. तिचे लग्न झाले होते. परंतु बराच काळ लोटला तरी तिला पुत्र प्राप्ती झाली नव्हती. परिवारात निराशा होती. सुजाताचे सासू सासरे आपल्या मुलाचे दुसरे लग्न करण्याच्या बेतात होते. त्यामुळे सुजाता दुःखी होती. एक दिवस सुजाता आपल्या महालात रडत असतांना तिची दासी "पूर्णा" महालात येते तर आपली मालकीण रडते आहे ! ते पाहून ती विचारते, "बाईसाहेब ! आपण रडत आहात, कारण काय?" मग तेव्हा सुजाता म्हणाली, "मला पुत्र प्राप्ती होत नाही म्हणून माझे सासू सासरे माझ्या पतीचा दुसरा विवाह करणार आहेत. मग माझे काय होणार?" तेव्हा पूर्णा म्हणते, "बाईसाहेब ! निरंजना नदी काठी एक वाटवृक्ष आहे. त्यावर एक नवदेवता वास करते, असे म्हणतात. आणि त्या वंनदेवतेला आपण नवस करावा, मागणे मागावे, पाहू तरी." हे ऐकून सुजाताच्या मनात भी नवीन आशा निर्माण झाली. तिने तेथे जाऊन त्या वटवृक्षाला नवस केला की, मला जर पुत्रप्राप्ती झाली तर, मी गाईच्या दुधाची खीर दान करीन, आणि पुत्र प्राप्तीची आशा मनी धरून परतली. (येथे वाचकांनी महत्वाचे लक्षात ठेवले पाहिजे की, नवसाने, उपासाने, किंवा देव पूजेने पुत्र होत नाही. संत तुकारामांच्या अभंगाप्रमाणे, नवसे पोरे होती तर का करणे लागे पती || हे ध्यानात ठेवावे.) परंतु त्या वेळच्या प्रचलीत रीती प्रमाणे सुजाताने नवस केला. निसर्ग नियमाप्रमाणे तिला मुलगा झाला. तिच्या परिवारात खूप आनंद झाला. तिने आपल्या परिवारासह सुवर्णपात्रात स्वादिष्ट खीर घेऊन जाण्याचे ठरविले होते. तिने आपली दासी पूर्णाला त्या वटवृक्षाखाली साफसफाई करण्यास पाठविले. पूर्णा

नदीकाठी आली असता सिद्धार्थ गौतम डुंगेशवरी पर्वत उतरून त्या वडाच्या झाडाखाली येऊन शरीर क्षिण झालेले, थकलेले अस्या अवस्थेत वडाच्या झाडाला टेकून बसलेले पाहिले. पूर्णाला वाटले, आपल्या मालकीणीचा नैवेद्य स्वीकारण्यास वंनदेवता एक आजारी, अशक्त रूपात अवतरली आहे. ही आनंदाची बातमी तिने येऊन आपली मालकीण सुजातास सांगितली. "बाईसाहेब, आपला नैवेद्य स्वीकारण्यास वृक्ष-वन देवता आज तिथे एका माणसाच्या रूपात अवतरली आहे." ही बातमी ऐकून सुजाताला फार आनंद झाला. आणि ती म्हणाली, हे खरे असेल तर मी आजपासून मी तुला दस्यत्वातून मुक्त करते आणि तुला मुलीसारखे सांभाळीन. सुजाताने तिला खूप बक्षीस दिले. बाळास बरोबर घेऊन ती आपल्या परिवारासह निरंजना नदीकाठी आली, तर खरोखरच वटवृक्षाखाली बोधिसत्व सिद्धार्थ हाडांचा सापडा झालेल्या अवस्थेत बसले होते. तिने बोधिसत्वास पाहिले आणि खरोखरच वनदेवताच आहे असे तिला मनोमन वाटले. तिने प्रथम वंदन केले. बरेच दिवस अन्न न घेतल्यामुळे बोधीसत्वाचे मन स्थिर नव्हते. आपण जर अन्न घेतलेच नाही तर मृत्युचे संकट येईल. आपण जगण्यासाठी आनंग्रहण केलेच पाहिजे असे मनी ठरविले होते. आणि त्याच दिवशी सुजाता आपला नवस पूर्ण करण्यासाठी आली होती. ती बोधिसत्वासमोर आपण आणलेल्या खिरीचे सुवर्णपात्र घेऊन बसलि आणि म्हणाली, "हे वनदेवते, माझे मनोरथ पूर्ण झाले आहे. मला आपल्या कृपेनें पुत्र प्राप्ती झाली आहे. त्यामुळे माझे जीवन सार्थकी लागले आहे. ही सारी तुझी कृपा आहे. तेव्हा आपणांस मी बोलल्याप्रमाणे गाईच्या दुधाची खीर नैवेद्य म्हणून आणली आहे. आपण तिचा स्वीकार करावा. अशी विनंती करते." हे सुजाताचे शब्द ऐकून तथागत म्हणाले -

"माते, मी कोणी देव नाही. देवाचा दूत नाही. तुझ्यासारखाच मानवाचा राजा शुद्धोधन आणि महामाया यांचा पुत्र आहे. मी सत्याचा शोध घेण्यासाठी, दुःखांच्या कारणाचा शोध घेण्यासाठी, वैरभावाचा शोध घेण्यासाठी हे तपाचरण करीत आहे. माते, खरोखरचं मला ज्ञानप्राप्ती व्हावी अशी शुभेच्छा व आशीर्वाद दे आणि तुझे खिरीचे भोजन सुखदायक ठरो अशी मला अपेक्षा आहे. तुझे कल्याण होवो. मंगल होवो आही अपेक्षा करतो." सुजाताने हातातील खिरीचे पात्र बोधीसत्वाच्या हाती दिले आणि म्हणाली, "माझे मनोरथ जसे पूर्ण झाले, तसे आपलेही मनोरथ पूर्ण होवोत. आपण शोध घेत आहात त्या ज्ञानाची आपणास प्राप्ती होवो." अशी शुभकामना व्यक्त केली. सिद्धार्थ गौतम सुजातास म्हणाले, "माते, मला सत्याचा शोध घेण्यासाठी तुझी खीर लाभदायक ठरो." असे शुभचिंतन करून त्या खिरीचा स्वीकार केला. निरंजना नदीकाठी जाऊन स्नान केले. आणि सुप्पतिठ्ठ नावाच्या घाटावर बसून त्या खिरीचे सेवन केले. तो दिवस चैत्र पौर्णिमेचा होता. तेव्हाच मनात एक संकल्प केला की, मला ज्ञान प्राप्त होणार असेल तर हे पात्र प्रवाहाच्या विरुद्ध वाहत जाईल. असे बोलून खिरीचे पात्र नदीत फेकले. ते पात्र बोधिसत्व बोलल्याप्रमाणे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला जाऊ लागले आणि काही अंतरावर गेल्यावर ते पात्र पाण्यात बुडाले. सिद्धार्थ गौतमाला तो घडलेला प्रसंग पाहून खूप आनंद झाला. त्या दिवशी चैत्र पौर्णिमा होती. या स्थळी आपणांस भगवान बुद्धांची मूर्ती बसविलेली आहे व सुजाता खिरीचे पात्र हातात घेऊन समोर बसलेली आहे अशी पाहावयास मिळते. या गावाला सुजाताचे गाव किंवा "बकरोल" असे म्हणतात. सुजाताची खीर सेवन केल्यावर सिद्धार्थ गौतम नदीतून गया प्रांतात जात असतांना स्वाथीय नावाच्या शेतकऱ्याने गवताची पेंढी दिली. त्या प्रसंगाचे पुतळे नदीकाठी आहेत. बोधिसत्व गयेत येतात आणि पिंपळाच्या झाडाखाली पूर्वेला मुख करून ध्यानसाधना करण्यास बसतात. तिथे एक संकल्प करतात की, माझे रक्त आटले, आहारीर सुकले तरी मी ज्ञानप्राप्ती झाल्याशिवाय या असणावरून उठणार नाही. चार आठवड्यांनी म्हणजे वैशाखी पौर्णिमेला त्यांना संबोधी प्राप्त झाली. असे या चैत्र पौर्णिमेचे महत्व आहे.

लेखक :- एम. डी. सरोदे.

☸☸🔵🔵🔵🌕 *चैत्र पौर्णिमा* (चेत मासो पुन्नमि) 🌕🔵🔵🔵☸☸

सुजाताचे तथागत भगवान बुद्धांना खीरदान

चैत्र पौर्णिमा. या पौर्णिमेला बौद्ध धम्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. रोहिणी नदीच्या पाणी वाटपाच्या झगड्यावरुन शाक्य आणि कोलीय यांच्यात सारखे भांडण होऊ लागले. शाक्य संघाने कोलीयांबरोबर युद्ध करण्याचे ठरविले. संघाच्या निर्णयाविरुद्ध सिद्धार्थ गेला. एकमताने युद्ध करण्याचे ठरले होते. परंतु सिद्धार्थ गौतमाने युद्धाला विरोध केला. मात्र त्याच्या मताला कोणीही सहमत झाले नाही. आणि संघाने शिक्षा केल्यावरुन वयाच्या २९ व्या वर्षी आषाढी पौर्णिमेला सिद्धार्थ गौतमाने आपल्या सर्व ऐश्वर्याचा, परिवाराचा त्याग करून प्रवज्जा घेतली. वेगवेगळ्या ऋषींच्या आश्रमात ज्ञान संपादन करीत असता सहा वर्षे लोटून गेली. मिळालेल्या ज्ञानाने त्याचे समाधान झाले नाही. शेवटी उरवेला येथे खडतर तपस्या करायची ठरवून डोंगर दरीत, झाडीत उपास तापास करू लागले. चार-चार सहा-सहा दिवस अन्न खात नव्हते. शरीर अस्थीपंजर झाले होते. असे करीत असता डुंगेश्वरी नावाच्या पर्वताच्या एका गुहेत (कपारीत) बसून घोर तपाचरण करू लागले. शरीर क्षीण, अशक्त झाले होते. चालता येत नव्हते. एक दिवस उठून चालले असता चक्कर येऊन पडले व शुद्धीवर आल्यावर त्यांनी ठरविले की, आपण अन्न ग्रहण केले तरच शरीर टिकेल, नाहीतर मृत्यू आपल्याला गाठेल आणि म्हणून त्यांनी ठरविले की, अन्न ग्रहण करावे. जवळच नदीच्या काठी एक वटवृक्ष होता, त्याखाली ते बसले. या नीरंजना नदीच्या काठी सिद्धार्थ बसलेले असतांना एक विशेष अशी घटना घडून आली. या भागात सेनानी नावाचे गांव होते. त्या नगरीत सेनानी नावाचा एक श्रीमंत होता. त्याला सुजाता नावाची एक मुलगी होती. तिचे लग्न झाले होते. परंतु बराच काळ लोटला तरी तिला पुत्र प्राप्ती झाली नव्हती.त्यामुळे सुजाता दुःखी होती. परंतु निसर्ग नियमाप्रमाणे तिला मुलगा झाला. तिच्या परिवारात फार आनंद झाला. तिने आपल्या परिवारासह सुवर्णपात्रात स्वादिष्ट खीर घेऊन जाण्याचे ठरविले होते. तिने आपली दासी पुर्णाला त्या वटवृक्षाखाली साफसफाई करण्यास पाठविले. पुर्णा नदीकाठी आली असता सिद्धार्थ गौतम डुंगेश्वरी पर्वत उतरुन त्या वडाच्या झाडाखाली येवून शरीर क्षीण झालेले थकलेले अशा अवस्थेत वडाच्या झाडाला टेकून बसलेले पाहिले. पुर्णाला वाटले आपल्या मालकिणीचा नैवेद्य स्विकारण्यास वनदेवता एक आजारी, अशक्त रुपात अवतरली आहे. ही आनंदाची बातमी तिने येऊन आपली मालकीण सुजातास सांगितली. 'बाईसाहेब, आपला नैवेद्य स्विकारण्यास वृक्ष-वन देवता आज तिथे एका माणसाच्या रुपात अवतरली आहे. ही बातमी ऐकून सुजाताला फार आनंद झाला. आणि ती म्हणाली, हे खरे असेल तर मी आजपासून तुला दास्यत्वातून मुक्त करते आणि तुला मुलीसारखे सांभाळीन. सुजाताने तिला खूप बक्षीस दिले. बाळास बरोबर घेऊन ती आपल्या परिवारासह नैरंजना नदीकाठी आली, तर खरोखर वटवृक्षाखाली बोधीसत्व सिद्धार्थ हाडांचा सापळा झालेल्या अवस्थेत बसले होते. तिने बोधीसत्वास पाहिले आणि खरोखरच वनदेवताच आहे असे तिला मनोमन वाटले. तिने प्रथम वंदन केले. बरेच दिवस अन्न न घेतल्यामुळे बोधीसत्वाचे मन स्थिर नव्हते. आपण जर अन्न घेतलेच नाही तर मृत्यूचे संकट येईल. आपण जगण्यासाठी अन्नग्रहण केलेच पाहिजे असे मनी ठरविले होते आणि त्याच दिवशी सुजाता आपला नवस पुरा करण्यासाठी आली होती.

ती बोधीसत्वासमोर आपण आणलेल्या खीरीचे सुवर्ण पात्र घेऊन बसली आणि म्हणाली- 'हे वनदेवते, माझे मनोरथ पूर्ण झाले आहे. मला आपल्या कृपेने पुत्र प्राती झाली आहे. त्यामुळे माझे जीवन सार्थकी लागले आहे. ही सारी तुझी कृपा आहे. तेव्हा आपणांस मी बोलल्याप्रमाणे गाईच्या दुधाची खीर नैवेद्य म्हणू आणली आहे. आपण तिचा स्वीकार करावा. अशी विनंती करते.'

हे सुजाताचे शब्द ऐकून तथागत म्हणाले- "माते, मी कोणी देव नाही. देवाचा दूत नाही. तुझ्यासारखाच मानवाचा राजा शुद्धोदन आणि महामाया यांचा पुत्र आहे. मी सत्याचा शोध घेण्यासाठी, दुःखाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी, वैरभावाचा शोध घेण्यासाठी हे तपाचरण करीत आहे. माते, खरोखरच मला ज्ञानप्राप्ती व्हावी अशी शुभेच्छा व आशिर्वाद दे आणि तुझे खीरीचे भोजन सुखदायक ठरो अशी मला अपेक्षा आहे. तुझे कल्याण होवो. मंगल होवो, अशी अपेक्षा करतो."

सुजाताने हातातील खीरीचे पात्र बोधीसत्वाच्या हाती दिले आणि म्हणाली- 'माझे मनोरथ जसे पूर्ण झाले, तसे आपलेही मनोरथ पूर्ण होवोत. आपण शोध घेत आहात त्या

ज्ञानाची आपणांस प्राप्ती होवो.' अशी शुभकामना व्यक्त केली.

सिद्धार्थ गौतम सुजातास म्हणाले- "माते, मला सत्याचा शोध घेण्यामध्ये तुझी खीर लाभदायक ठरो." असे शुभचिंतन करून त्या खीरीचा स्वीकार केला.

नैरंजना नदीकाठी जाऊन स्नान केले आणि सुप्पतिठ्ठ नावाच्या घाटावर बसून त्या खीरीचे सेवन केले. तो दिवस चैत्र पौर्णिमेचा होता. तेव्हाच मनात एक संकल्प केला की, मला ज्ञान प्राप्त होणार असेल तर हे पात्र प्रवाहाच्या विरुद्ध वाहत जाईल. असे बोलून खीरीचे पात्र नदीत फेकले. ते पात्र बोधीसत्व बोलल्याप्रमाणे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला जाऊ लागले आणि काही अंतरावर गेल्यावर ते पात्र पाण्यात बुडाले. सिद्धार्थ गौतमाला तो घडलेला प्रसंग पाहून खूप आनंद झाला. त्या दिवशी चैत्र पौर्णिमा होती. या स्थळी आपणांस भगवान बुद्धांची मूर्ती बसविलेली आहे व सुजाता खीरीचे पात्र हातात घेऊन समोर बसलेली आहे अशी पहावयास मिळते. या गावाला सुजाताचे गांव किंवा 'बकरोल' असे म्हणतात. सुजाताची खीर सेवन केल्यावर सिद्धार्थ गौतम नदीतून गया प्रांतात जात असताना स्वाथिय नावाच्या शेतक-याने गवताची पेंढी दिली. त्या प्रसंगाचे पुतळे नदीकाठी आहेत. बोधीसत्व गयेत येतात आणि पिंपळाच्या झाडाखाली पूर्वेला मुख करून ध्यानसाधना करण्यास बसतात. तिथे एक संकल्प करतात की, माझे रक्त आटले, शरीर सुकले तरी मी ज्ञान प्राप्ती झाल्याशिवाय या आसनावरुन उठणार नाही. चार आठवड्यांनी, म्हणजे वैशाखी पौर्णिमेला त्यांना संबोधी प्राप्त झाली. असे या चैत्र पौर्णिमेचे महत्व आहे. या *चैत्र पौर्णिमेला बौद्ध समूहात अनन्यसाधारण महत्त्व आहे.*

या दिवशी बुद्ध विहारात उपासक-उपासिका यांनी एकत्रित जमुन बुद्ध पूजापाठ करावा. खीरदान करावी.

🌈🌷*चैत्र पौर्णिमेच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा!* !जयभीम ! !!जयभारत!! !!!नमोबुद्धाय!!!

☸☸🔵🔵🔵🌕 चैत्र पौर्णिमा. (चेत मासो पुंन्नमि) 🌕🔵🔵🔵☸☸

चैत्र पौर्णिमेच्या दिवशी भगवान बुद्धांच्या जीवनात ५ महत्वपूर्ण घटना घडल्या.

🔹 १. भृगु ऋषींच्या आश्रमात प्रवेश तसेच निरोप. 🔹 २. उद्रक रामपुत्त यांच्या आश्रमात प्रवेश तसेच निरोप. 🔹 ३. कपिल मुनींच्या 'सांख्य दर्शन' तत्वज्ञानाचा अभ्यास. 🔹 ४. एक शूद्र व्यक्तीने धन दान म्हणून दिले. 🔹 ५. सुजाताचे खीर दान.

१. भृगु ऋषींच्या आश्रमात प्रवेश तसेच निरोप.

भारद्वाजांचे गुरु 'आलारकालाम' हे योग साधनेत निपुण असे अभ्यासक होते. त्यावेळी ते वैशाली येते राहत होते. आणि सिद्धार्थ गौतम राजगृहाजवळील गुहाकुटपर्वत टेकडीवर पर्णकुटीत राहत होते. आलारकालाम यांना भेटण्यासाठी सिद्धार्थ गौतम तेथून निघाले. जाता जाता भृग ऋषींचा आश्रम लागला.

भृग ऋषींचे तत्वज्ञान आणि उपासना जाणून घेण्यासाठी आश्रमात प्रवेश केला. शाररिक कष्ट करून तपस्वी जीवन जगणे हे त्यांचे तत्वज्ञान होते. सिद्धार्थ गौतमांना हे आवडले नाही आणि त्यांनी निरोप घेतला.

दोन्ही हि घटना वेगवेगळ्या चैत्र पौर्णिमेला घडल्या. म्हणजे १ वर्ष सिद्धार्थ गौतम हे भृग ऋषींकडे होते.

२. उद्रक रामपुत्त यांच्या आश्रमात प्रवेश तसेच निरोप.

उद्रक रामपुत्त हे समाधी योग साधनेत निपुण होते. सिद्धार्थ गौतमांनी तेथे 'अकियन्या यतन' नावाची समाधी पर्यंत अभ्यास केला. त्यांच्या कडून हि निरोप घेतला तो दिवस चैत्र पौर्णिमेचा होता. म्हणजे इथे ही १ वर्ष सिद्धार्थ गौतम राहिले होते.

३. कपिल मुनींच्या 'सांख्य दर्शन' तत्वज्ञानाचा अभ्यास.

त्याकाळी कपिल मुनी हे सर्व तत्वज्ञानी लोकांमध्ये प्रमुख होते. त्यांचा सांख्य दर्शन तत्वज्ञान/सिद्धांत हा सत्यावर आधारित होता. कुठली वस्तू/गोष्ट सत्य असण्यासाठी तिला प्रमाण असणे अत्यावश्यक आहे.

ह्या तत्वज्ञानाचा अभ्यास करून सिद्धार्थने ३ गोष्टी ग्रहण केल्या.

१. सत्य प्रमाणावर म्हणजेच पाहिलेले किंवा अनुभवलेले असावे. २. ईश्वर अस्तित्वाचे कुठले हि प्रमाण नाही म्हणून ईश्वर आणि आत्मा अस्तित्वाविषयीची चर्चा व्यर्थ आहे. ३. जीवनात दुःख आहे.

४. एक शूद्र व्यक्तीने धन दान म्हणून दिले.

एक शूद्र जातीतील व्यक्ती जो धनगर होता त्याने तथागताना खूप सारे धन दान म्हणून दिले.

५. सुजाताचे खीर दान.

इतके सारे ध्यान साधना करून हि ज्ञान प्राप्ती होत नव्हती. मग सिद्धार्थ गौतम फक्त एक फळ खाऊन राहू लागले.

प्राचीन निरंजना नदीवरील उरुवेला अर्वाचीन बुद्धगयाच्या शेजारी सेनानी गाव होते. सुजाताचे हे जन्म गाव. सध्या त्या गावाचे नाव बकरौर आहे. सुजाता हिला जसा हवा तसा

सुशील, सुंदर आणि कमाई करणारा वर मिळाला आणि प्रथम पुत्रप्राप्त झाल्यावर निर्जल दुधाची खीर नैवेद्य म्हणून त्या वटवृक्षाला अर्पण करेल असे मनोगत व्यक्त केले होते.

चैत्र पौर्णिमेच्या दिवशी तिची दासी पन्ना तिथे साफसफाई साठी जाता तिला सिद्धार्थ गौतम दिसले. तिने हि घटना सुजाताला सांगितली तर स्वतः सुजाता तिथे सोन्याच्या पात्रात खीर घेऊन आली व सिद्धार्थ गौतमाने ती स्वीकारली.

सुजातकडे १००० गायी होत्या. तिने त्या सर्वांना गोड वालमी खायला घालत. त्यामुळे त्या गायींचे दूध अधिक गोड आणि पौष्टिक येत. त्या १००० गायींचे दूध ५०० गायींना, ५०० चे २५० गायींना असे करून शेवटी ८ गायींना ते दूध पाजले. आणि ती खीर ह्या ८ गायींच्या दुधापासून बनवली गेलेली होती.

तिने प्रथम वंदन केले. बरेच दिवस अन्न न घेतल्यामुळे बोधीसत्वाचे मन स्थिर नव्हते. आपण जर अन्न घेतलेच नाही तर मृत्युचे संकट येईल. आपण जगण्यासाठी अन्नंग्रहण केलेच पाहिजे असे मनी ठरविले होते. आणि त्याच दिवशी सुजाता आपला नवस पूर्ण करण्यासाठी आली होती. ती बोधिसत्वासमोर आपण आणलेल्या खिरीचे सुवर्णपात्र घेऊन बसलि आणि म्हणाली, "हे वनदेवते, माझे मनोरथ पूर्ण झाले आहे. मला आपल्या कृपेनें पुत्र प्राप्ती झाली आहे. त्यामुळे माझे जीवन सार्थकी लागले आहे. ही सारी तुझी कृपा आहे. तेव्हा आपणांस मी बोलल्याप्रमाणे गाईच्या दुधाची खीर नैवेद्य म्हणून आणली आहे. आपण तिचा स्वीकार करावा. अशी विनंती करते." हे सुजाताचे शब्द ऐकून तथागत म्हणाले -

"माते, मी कोणी देव नाही. देवाचा दूत नाही. तुझ्यासारखाच मानवाचा राजा शुद्धोधन आणि महामाया यांचा पुत्र आहे. मी सत्याचा शोध घेण्यासाठी, दुःखांच्या कारणाचा शोध घेण्यासाठी, वैरभावाचा शोध घेण्यासाठी हे तपाचरण करीत आहे. माते, खरोखरचं मला ज्ञानप्राप्ती व्हावी अशी शुभेच्छा व आशीर्वाद दे आणि तुझे खिरीचे भोजन सुखदायक ठरो अशी मला अपेक्षा आहे. तुझे कल्याण होवो. मंगल होवो अशी अपेक्षा करतो." सुजाताने हातातील खिरीचे पात्र बोधीसत्वाच्या हाती दिले आणि म्हणाली, "माझे मनोरथ जसे पूर्ण झाले, तसे आपलेही मनोरथ पूर्ण होवोत. आपण शोध घेत आहात त्या ज्ञानाची आपणास प्राप्ती होवो." अशी शुभकामना व्यक्त केली. सिद्धार्थ गौतम सुजातास म्हणाले, "माते, मला सत्याचा शोध घेण्यासाठी तुझी खीर लाभदायक ठरो." असे शुभचिंतन करून त्या खिरीचा स्वीकार केला. निरंजना नदीकाठी जाऊन स्नान केले. आणि सुप्पतिठ्ठ नावाच्या घाटावर बसून त्या खिरीचे सेवन केले. तो दिवस चैत्र पौर्णिमेचा होता. तेव्हाच मनात एक संकल्प केला की, मला ज्ञान प्राप्त होणार असेल तर हे पात्र प्रवाहाच्या विरुद्ध वाहत जाईल. असे बोलून खिरीचे पात्र नदीत फेकले. ते पात्र बोधिसत्व बोलल्याप्रमाणे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला जाऊ लागले आणि काही अंतरावर गेल्यावर ते पात्र पाण्यात बुडाले. सिद्धार्थ गौतमाला तो घडलेला प्रसंग पाहून खूप आनंद झाला. त्या दिवशी चैत्र पौर्णिमा होती. या स्थळी आपणांस भगवान बुद्धांची मूर्ती बसविलेली आहे व सुजाता खिरीचे पात्र हातात घेऊन समोर बसलेली आहे अशी पाहावयास मिळते. या गावाला सुजाताचे गाव किंवा "बकरोल" असे म्हणतात. सुजाताची खीर सेवन केल्यावर सिद्धार्थ गौतम नदीतून गया प्रांतात जात असतांना स्वाथीय नावाच्या शेतकऱ्याने गवताची पेंढी दिली. त्या प्रसंगाचे पुतळे नदीकाठी आहेत. बोधिसत्व गयेत येतात आणि पिंपळाच्या झाडाखाली पूर्वेला मुख करून ध्यानसाधना करण्यास बसतात. तिथे एक संकल्प करतात की, माझे रक्त आटले, शरिरही सुकले तरी मी ज्ञानप्राप्ती झाल्याशिवाय या असणावरून उठणार नाही. चार आठवड्यांनी म्हणजे वैशाखी पौर्णिमेला त्यांना संबोधी प्राप्त झाली. असे या चैत्र पौर्णिमेचे महत्व आहे.

सिद्धार्थ गौतमाचे हे शेवटचे अन्न ग्रहण होते ज्ञान प्राप्ती पूर्वीचे. हा दिवस चैत्र पौर्णिमा इ. स. पू. ५२८ चा होता. संबोधी प्राप्ती नंतर स्वतः भगवान बुद्ध सुजाताला भेटण्यासाठी सेनानी गावी आले आणि तिला दिक्षा दिली.

बौद्ध इतिहासात सुजाताला व तिच्या खीरीला अनन्य साधारण महत्व आहे.

या पौर्णिमेला भगवान बुद्धा ने श्रीलंके मध्ये दुसऱ्यांदा भेट दिली.

श्री लंके मधील नागदीपाचे नागराजा महोदरा आणि चुलोदरा या दोघांमध्ये रत्नजळीत राजसिंहासनावरून युद्ध होणार होते. दोन्ही पक्षानी लढाईची तयारी केली होती. तेव्हा भगवान बुध्दानी त्या ठिकाणी जाऊन तेथे शांतता प्रस्थापित केली आणि दोन्ही पक्षात मैत्री प्रस्थापित केली व मंगल मैत्रीच्या भावने बद्धल शिकवण देऊन त्याचे महत्व सांगितले. म्हणून या पौर्णिमेचे महत्व आहे. प्रत्येक महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला बौद्ध धम्मात महत्वाचे स्थान आहे. म्हणून आपण सर्व पौर्णिमा अत्यंत आंनद आणि उत्साहानी साजरी करावी. पौर्णिमेच्या दिवशी सकाळी लवकर उठून आंघोड करून सफेद वस्त्र परिधान करावे. बुद्ध विहारात जाऊन बुद्धाची पूजा करावी. त्रिवार अभिवादन करावे. भन्तेजी चे प्रवचन श्रवण करून दुःख मुक्ती चा मार्ग समजून घ्यावा.

चेतमासो पुन्नमि चैत्र पौर्णिमेच्या सर्व सर्व उपासक/उपासिकाना, सभासदांना मंगलमय हार्दिक शुभेच्छा 💐💐💐💐💐

🌕☸☸🔵🔵🔵 वैशाख पौर्णिमा (बुद्ध पौर्णिमा) (वेसाख मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸🌕

🌕(वेसाक्को मासो पुन्नमि/वैशाख पौर्णिमा)🌕

आज दिनांक १ मे २०२६ रोजी, बुद्धाब्द २५९० वी वैशाख पौर्णिमा आहे.

👉 सिद्धार्थ गौतमाचा लुम्बिनी शालवनात जन्म, सिध्दार्थ गौतमाचा व युवराज्ञी यशोधरेचा विवाह, सिद्धार्थ गौतमाला बोधगया येथील पिंपळ (बोधिवृक्ष) वृक्षाखाली सम्यक संबोधी प्राप्ती आणि तथागत भगवान गौतम बुद्धांचे कुशीनारा येथे शाल वृक्षाखाली महापरिनिर्वाण. अशा चौगुणी पावन बुध्द पौर्णिमेच्या लाख लाख मंगलमय शुभेच्छा!🙏

☸तथागत भगवान सिद्धार्थ गौतमांच्या बुद्धांच्या जीवनात सर्व पौर्णिमांचे महत्त्व आहे.त्यामध्ये विशेषतः बौद्ध जगतात वैशाख पौर्णिमेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. तथागतांच्या जीवनातील काही महत्त्वांच्या खालील घटना वैशाखी पौर्णिमेच्या असल्याने जगातील बौद्ध धर्मीय लोक वैशाखी पौर्णिमा मोठ्या प्रमाणावर उत्साहात साजरी करतात.

१🟦 कपिलवस्तुचा शाक्य वंशीय राजा शुध्दोधन आणि राणी महामाया यांचा राजपुत्र सिध्दार्थ गौतमाचा जन्म.. लुम्बिनी वनात शाल व्रुक्षाखाली इ. स. पू. ५६३, वैशाख पौर्णिमा. वार:– मंगळवार.

२🟦 राजपुत्र सिध्दार्थ गौतमाचा व युवराज्ञी यशोधरेचा विवाह १६ व्या वर्षी – इ. स. पू. ५४७, वैशाख पौर्णिमा.

३🟦 सिध्दार्थ गौतमाला सम्यक संबोधी ज्ञानप्राप्ती गया येथील निरंजना नदीकाठी असलेल्या पिंपळ (बोधी) व्रुक्षाखाली ३५ व्या वर्षी.. वैशाखी पौर्णिमा इ. स. पू. ५२८, वार:– बुधवार.

४🟦 तथागत भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण मल्ल गणराज्याची राजधानी कुशीनारा येथील शालवनात जोडशाल व्रुक्षाखाली ८० व्या वर्षी-वैशाख पौर्णिमा, इ. स. पू. ४८३, वार:– शुक्रवार.

☸ सिध्दार्थ गौतमाच्या जन्माच्या दिवशी म्हणजे वैशाख पौर्णिमाला जम्बुद्विपात काही विभूतींचा जन्म झाला. (उत्पन्न झालेत)।

(१) कपिलवस्तु नगरीच्या शेजारी रामग्राम नगरीत कोलीय वंशीय राजा सुप्पबुध्द अर्थात दंडपाणी आणि राणी पमिता यांची कन्या युवराज्ञी 'यशोधरा' (गोपा), सिद्धार्थ गौतमाची पत्नी, राहुल माता आणि थेरी भद्दकच्चायना म्हणून प्रसिद्ध झालेल्या भिक्खूनीचा जन्म–वैशाख पौर्णिमा, इ. स. पू. ५६३.

(२) राजा शुध्दोधनाचा भाऊ अमितोदन याचा पुत्र व सिध्दार्थ गौतमाचा चुलत भाऊ आणि प्रिय शिष्य, 'आनंद' महास्थविराचा जन्म, याच दिवशी.. वैशाख पौर्णिमेला.

(३) सिध्दार्थ गौतमाच्या जन्माच्या दिवशीच राजा शुध्दोधनाचा अमात्य उदासेन याचा पुत्र व पुढे सिध्दार्थ गौतमाचा बालपणाचा मित्र आणि ज्याला पुढे राजा शुद्धोधनाने मंत्री बनवले त्या..'कालुदायी' चा जन्म.. वैशाख पौर्णिमेला. ज्याला सिद्धार्थ गौतमाच्या महाभिनिष्क्रमणा नंतर शुद्धोधन राजाने मंत्री बनविले.

(४) सिध्दार्थ गौतमाच्या जन्माच्या दिवशीच सिध्दार्थ गौतमाचा सारथी 'छन्न' चा जन्म वैशाख पौर्णिमेला झाला.

(५) सिध्दार्थ गौतमाचा प्रिय अश्व, ज्यावर आरुढ होऊन महाभिनिष्क्रमण केले 'कन्थक' चा जन्म याच दिवशी.. वैशाख पौर्णिमेला झाला.

(६) अजानीय गजराजा चा जन्म याच दिवशी वैशाख पौर्णिमेला.

(७) सिध्दार्थ गौतमाच्या जन्माच्या दिवशीच गया/उरुवेला येथे बोधीव्रुक्षाचा (पिंपळ) जन्म: वैशाख पौर्णिमेला झाला.

(८) सात सुवर्ण कलषाची निर्मिती वैशाख पौर्णिमेला. सोन्या चांदीचे पुर्ण भरलेले पात्र जे पूर्णपणे उपभोग घेऊनही कधीही रिक्त होत नाही.

☸️ त्याचप्रमाणे...

🔅 कपिलवस्तु नगरीच्या शेजारी रामग्राम नगरीत कोलीय वंशीय राजा सुप्पबुध्द अर्थात दंडपाणी आणि राणी पमिता यांची कन्या युवराज्ञी 'यशोधरा' (गोपा), सिद्धार्थ गौतमाची पत्नी, राहुल माता आणि थेरी भद्दकच्चायना म्हणून प्रसिद्ध झालेल्या भिक्खूंनीचा जन्म-वैशाख पौर्णिमेला, इ. स. पू. ५६३ ला झाला... आणि.. राजपुत्र सिध्दार्थ गौतमाशी युवराज्ञी यशोधरेचा विवाह १६ व्या वर्षी - इ. स. पू. ५४७, वैशाख पौर्णिमेंला झाला.

माता यशोधरा (थेरी भद्दकच्चायना) चे महापरिनिर्वाण तथागत भगवान गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणा आधी दोन वर्षे म्हणजे वयाच्या ७८ व्या वर्षी इ. स. पू. ४८५ ला झाले.

🔅 तथागतांच्या महापरिनिर्वाणा नंतर २३१ वर्षांनी श्रीलंकेतील देवाणांम प्रिय तिष्य राजाचा राज्यभिषेक इ. स. पू. २५३ मध्ये वैशाख पौर्णिमेला करण्यात आला.

☸️वरील सर्व घटनांचा आजच्या वैशाखी पौर्णिमेचा अद्भुत मंगल संयोग आहे.

जगाला सत्य, अहिंसा, करुणा आणि शांतीचा संदेश देणारे, "लाईट ऑफ एशिया", करुणासागर, महाकारुणिक, तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या.. इ. स. पू. ५६३ + ०(१) + २०२६ = २५९० व्या जयंतीच्या... लुम्बिनी बुद्ध विहार समिती, लुम्बिनी बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्ट, धुळे आणि लुम्बिनीवन परिसराच्या वतीने.. मंगलमय शुभेच्छासह मंगल कामना!🙏

✍️ – प्रा. विजय पवार.

☸️☸️🔵🔵🔵 वैशाख पौर्णिमा (बुद्ध पौर्णिमा) (वेसाख मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸️☸️

आज दिनांक ५ मे २०२६ रोजी, बुद्धाब्द २५९० वी वैशाख पौर्णिमा आहे.

१. ही पौर्णिमा मे महिन्यात येते. बुद्ध धम्माच्या संपूर्ण अनुयायांसाठी ही सर्वात महत्वाची पौर्णिमा आहे. या पौर्णिमेला त्रिगुणी पौर्णिमा असे म्हणतात. याच पौर्णिमेला सिद्धार्थ गौतमाचा महामाया व शुद्धोदन यांचा पुत्र म्हणून लुंबिनी वनातील शाल वृक्षाखाली जन्म झाला.

२. महामाया ही मोठ्या लवाजम्यासह बाळंतपणासाठी आपल्या पित्याच्या घरी पालखीतून जात होती. सुंदर व मनोरम अशा लुंबिनी वनात जाताना महामायेच्या मनात तेथे काही वेळ थांबण्याची इच्छा निर्माण झाली.

३. महामाया या वनात थांबली असताना व शाल वृक्षाची फांदी हातात धरली असताना तिने उभ्यानेच मुलाला जन्म दिला.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्धार्थ गौतमाच्या जन्माचे अत्यंत सुंदर असे वर्णन भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात केले आहे. ते लिहितात:

५. "पात्रातील तेलाप्रमाणे महामायेने दहा महिने बोधिसत्त्वाला आपल्या गर्भात धारण केले. तिचा प्रसूतीकाळ जवळ येऊ लागताच प्रसूतीसाठी आपल्या माहेरी जाण्याची तिने इच्छा व्यक्त केली. आपल्या पतीला ती म्हणाली, "माझ्या पित्याच्या देवदहनगरीला मी जाऊ इच्छिते."

६. "तुझ्या इच्छेप्रमाणे होईल." राजाने उत्तर दिले. सोन्याच्या पालखीत बसवून शुद्धोदनाने मोठ्या लवाजम्यासहित तिला तिच्या पित्याच्या घरी पाठविले.

७. देवदहला जात असतांना मार्गात फुलांनी बहरलेल्या तसेच पुष्पविरहित अशा वृक्षांच्या आल्हाददायक गर्द वनराईतून महामायेला जावे लागणार होते. तेच लुंबिनी वन होय.

८. लुंबिनी वनातून पालखी नेली जात असताना ते वन स्वर्गीय अशा चित्रलता वनाप्रमाणे किंवा एखाद्या महाप्रतापी राजाच्या स्वागतासाठी सुशोभित केलेल्या मंडपासारखे

भासत होते.

९. बुंध्यापासून फांद्यांच्या शेंड्यांपर्यंत तेथील वृक्ष फळाफुलांनी ओथंबलेले होते. त्यावर नानारंगांचे असंख्य भ्रमर चित्रविचित्र आवाजात गुंजारव करीत होते आणि निरनिराळ्या प्रकारचे पक्षीगण मंजुळ स्वरालाप काढीत होते.

१०. तेथील मनोरम दृश्य पाहून महामायेच्या मनात तेथे थांबून काही काळ क्रीडाविहार करण्याची इच्छा उत्पन्न झाली. म्हणून तिने पालखी वाहणाऱ्या सेवकास आपली पालखी शालवृक्षाच्या कुंजात नेऊन उतरविण्यास व तेथे उभे राहण्यास सांगितले.

११. महामाया पालखीतून उतरली व तेथील एका सुंदर शालवृक्षाच्या बुंध्याशी चालत गेली. त्या शालवृक्षाच्या फांद्या वाऱ्याच्या झुळुकीने वर खाली हेलावत असलेल्या पाहून महामायाला त्यांपैकी एक फांदी हाताने धरावी असे वाटले.

१२. सुदैवाने एक फांदी सहजगत्या तिला धरता येईल एवढी खाली आली. इतक्यात ती आपल्या पायाच्या चवड्यावर उभी राहिली व तिने ती फांदी हाताने धरली. तेवढ्यात फांदी वर गेल्यामुळे झटक्याने महामाया वर उचलली गेली. आणि अशाप्रकारे हालल्यामुळे तिला प्रसूतीच्या वेदना होऊ लागल्या. शालवृक्षाची फांदी हातात धरली असताना उभ्यानेच तिने मुलाला जन्म दिला.

१३. त्या मुलाचा जन्म ख्रिस्तपूर्व ५६३ व्या वर्षी वैशाखी पौर्णिमेला झाला.

१४. शुद्धोदन व महामाया यांचा विवाह होऊन पुष्कळ वर्षे झाली होती. परंतु त्यांच्या पोटी संतान नव्हते. आणि म्हणून पुत्रप्राप्ती झाली तेव्हा शुद्धोदनाने व त्याच्या परिवाराने आणि सर्व शाक्यांनी पुत्रजन्माचा तो उत्सव मोठ्या हर्षोल्हासाने थाटामाटात साजरा केला.

१५. पुत्रजन्माच्या यावेळी कपिलवस्तूचे राजपद भूषविण्याची पाळी शुद्धोदनाची होती. अर्थातच त्यामुळे त्या बालकाला युवराज म्हणून संबोधण्यात येऊ लागले."

१६. याच वैशाख पौर्णिमेला सिद्धार्थ गौतम हा वयाच्या ३५ व्या वर्षी गया येथे निरंजना नदीच्या काठी असलेल्या उरूवेला वनामध्ये पिंपळवृक्षाखाली बसला असताना बुद्ध झाला.

१७. सिद्धार्थ गौतमास वैशाख पौर्णिमेच्या रात्री तिसऱ्या प्रहरी दुःख मुक्तीचे ज्ञान प्राप्त झाले. त्याच्या मनातील अंधकार पूर्णपणे दूर झाला व तो सम्यक संबुद्ध झाला.

१८. याच दिवशी सिद्धार्थ गौतमाला चार आर्यसत्यांची अनुभूती झाली. भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्धार्थ गौतमाच्या बुद्ध बनण्याच्या प्रक्रियेचे सविस्तर विवेचन केलेले आहे. या ग्रंथात प्रकरण तीन मध्ये यावर प्रकाश टाकला आहे.

१९. याच पौर्णिमेच्या दिवशी ख्रिस्तपूर्व ४८३ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी सिद्धार्थ गौतम बुद्धांचे मल्ल गणराज्याची राजधानी कुशीनारा येथील शाल वाटीकेत महापरिनिर्वाण झाले.

२०. या पौर्णिमेच्या रात्री तिसऱ्या प्रहरी मनाच्या जागरूक अवस्थेत समाधीचा अभ्यास करताना गौतम बुद्धांचा मृत्यू झाला.

२१. गौतम बुद्धांच्या जीवनात जन्म, बुद्धत्व प्राप्ती व महापरिनिर्वाण या तिन्ही घटना वैशाख पौर्णिमेच्या दिवशी घडल्या आहेत.   निसर्गात दुर्मिळ अशाच या घटना आहेत.

२२. या तिन्ही घटना वैशाख पौर्णिमेला घडल्यामुळे या पौर्णिमेस त्रिगुणी पौर्णिमा असे म्हणतात.

२३. हा अत्यंत महत्त्वाचा सण आहे. तो आनंदाने व उत्साहाने साजरा केला पाहिजे, प्रत्येकाने आपले घर स्वच्छ केले पाहिजे, सजविले पाहिजे, गोडधोड करून इतरांना वाटले पाहिजे, मित्रांना व नातेवाईकांना आपल्या घरी आमंत्रित केले पाहिजे. मुलांसाठी नवीन कपडे खरेदी केले पाहिजेत.

२४. अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या त्रिगुणी पौर्णिमेच्या दिवशी अष्टशीलाचे पालन केले पाहिजे.

२५. संपूर्ण बुद्ध विहारे व धम्म प्रशिक्षण संस्था यांनी धम्म कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत, विहारे सजविली पाहिजेत, धम्म प्रवचने आयोजित केली पाहिजेत व मने उल्हासाने व आनंदाने ओतप्रोत भरलेली असली पाहिजेत.

☸☸🔵🔵🔵 जेष्ठ पौर्णिमा (जेठ्ठ मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

१. पहिली घटना :– ब्रम्हदेशाचे दोन व्यापारी तपस्सू व भल्लिक यांना उपासक केले. २. दुसरी घटना :– त्या दोन व्यापाऱ्यांच्या विनंतीवरून भगवान बुद्धांनी त्यांना केश धातू भेट दिले. ३. तिसरे महत्व :– तथागत भगवान बुद्धांनी सेनानी कन्या सुजाताला सेनानी गावात जाऊन धम्माचा उपदेश केला. ४. चौथी घटना :– सम्राट अशोक महानने आपले पुत्र महेंद्र व पुत्री संघमित्राला बोधिवृक्षाची शाखा घेऊन श्रीलंकेत पाठविले होते. ५. पाचवी घटना :– भिक्खू महेंद्र यांचे निर्वाण.

प्रत्येक पौर्णिमा तथागत बुद्धांच्या कोणत्या न कोणत्या जीवन घटनेशी रेखांकित करते.

१. पहिले उपासक तपुस्स आणि भल्लीक यांची धम्मदीक्षा :–

भगवंतास ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर एक महिना बोधिवृक्षाखाली राहिले आणि पाचव्या आठवड्यात ते गोथर्ड च्या पर्वताकडे गेले आणि एक आठवडा तेथे वास्तव्य केले. नंतर

मुचलिंद नावाच्या पर्वताकडे आपला मोर्चा वळवला. तेथील राजयतन वृक्षाखाली एक आठवडा वास्तव्य केले. पुढील आठवड्याच्या शेवटच्या दिवशी त्यांच्या दिशेने येतांना दोन गृहस्थ दिसले. ते दोन गृहस्थ म्हणजे तपुस्स आणि भल्लीक गे दोन बंधू होते. ते दोन बंधू व्यापारी होते. ते पाच गाड्यावर माल लादून त्या रस्त्याने जात होते. व्यापारी बंधूंना भगवंत दिसताच त्यांना वंदन करून त्यांच्या जवळ असलेल्या मध व पोळ्या दिल्या व खाद्यपदार्थ स्वीकारण्याची विनंती केली. भगवंतांनी त्यांची भेट स्वीकारली. आपली भेट स्वीकारल्याचे पाहून त्या व्यापाऱ्यांनी भगवंतास वंदन केले आणि आम्ही आपणास शरण आलो आहोत. आपले अनुयायी म्हणून धम्माचे सर्व नियम आम्ही पाळू व आम्हास सदधम्माची दिक्षा द्यावी अशी नम्र प्रार्थना केली.

भोजन झाल्यावर तथागताने या व्यापाऱ्यांना आपला पहिला धम्म उपदेश केला. दोन सरणं देऊन त्यांना उपासक केले. दोन सरणं म्हणजे "बुद्धं सरणं गच्छामि | धम्मं सरणं गच्छामि ||" तेव्हा भगवंतांनी त्यांना उपासक या नावाने संबोधले व त्यांना धम्मात प्रवेश दिला. त्यावेळी संघ नावाची संस्था अस्तित्वात नव्हती. ज्या दिवशी ह्या दोन व्यापारी बंधूना सदधम्माची शिकवण देऊन उपासक म्हणून दीक्षित केले तो दिवस जेष्ठ पौर्णिमा होय.

भगवान बुद्धाच्या उपासनेचे काही तरी साधन असावे म्हणून अशी इच्छा व्यक्त केली तेव्हा भगवंतांनी त्यांचे आठ केस जटा स्मृतिचिन्ह म्हणून दिले. त्या व्यापाऱ्यांनी ब्रम्हदेशात जाऊन भगवान बुद्धांच्या केश धातूवर १५० फुट उंच स्तूप बांधलेला आहे. तेथील लोक प्रत्येक जेष्ठ पौर्णिमेला फार श्रद्धेने जमतात आणि पूजापाठ, वंदना, प्रवचन यांचे ओयोजन केले जाते. हा स्तूप आजही ब्रम्हदेशात आहे.

२. जेष्ठ उपासिका सुजातास धम्मदिक्षा :–

बुद्धगया येथे ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर तेव्हा त्यांना सुजाताने चैत्र पौर्णिमेला अर्पण केलेल्या खीर ची आठवण झाली आणि सुजाताला दिलेल्या वचनाची (सत्याचा मार्ग प्राप्त झाल्यानंतर मला येऊन भेटावे.) आठवण झाली. त्या वचनपूर्ती साठी सुजताचा शोध घेतला. सुजताच्या पतीस व तिचा पुत्र यश यास सदधम्माची दिक्षा दिली. सुजाताचे वाराणसीत एकमेव कुटुंब होते की ज्यांनी सर्वप्रथम सहपरिवार दिक्षा ग्रहण केली. सुजाता विषयी भगवंत म्हणाले की "भिक्खुंनो ! माझ्या उपासिकांमध्ये प्रथम येणाऱ्या मध्ये सुजाता सर्वश्रेष्ठ आहे." सहपरिवार सुजातास दीक्षित केलेला दिवस होता जेष्ठ पौर्णिमेचा.

३. संघमित्रा आणि महेंद्र यांनी श्रीलंकेत बोधिवृक्ष लावला :–

सम्राट अशोकांनी जेव्हा त्यांचे धम्मगुरु महास्थाविर मोग्गलीपुत्त तिस्स यांना विचारणा केली की "मला धम्माचा दायाद बनण्यासाठी आणखी काय करावे लागेल? तेव्हा भन्ते म्हणाले "जो कोणी आपला स्वतःचा मुलगा मुलगी धम्मास दान देतो त्यांना धम्मामध्ये प्रवज्जीत करून भिक्खू बनवितो तोच 'दायक' आणि 'दायाद' या दोन्ही उपाधीसाठी पात्र बनतो." तेव्हा सम्राट अशोकाने आपला पुत्र महेंद्र आणि पुत्री संघमित्रा यांना प्रवज्जा धारण करणार का? अशी विचारणा केली तेव्हा दोघांनीही उत्तर दिले की "आपली इच्छा असेल तर आम्ही आजच प्रवज्जीत होऊ, प्रवज्जा ग्रहण केल्याने आमचे व आपलेही कल्याण होईल असे आम्हाला वाटते." यानुसार आपल्या पित्याच्या इच्छेपोटी महेंद्र आणि संघमित्रा यांनी गृहस्थ जीवनाचा त्याग करून प्रवज्जा घेतली. त्यावेळी महेंद्रचे वय २० वर्षे तर संघमित्राचे वय १९ वर्षे होते.

महापती महेंद्र यास प्रवज्जीत होऊन बारा वर्षे झाल्यानंतर त्यांच्या उपाध्यायाने (मोग्गलीपुत्त तिस्स) आणि संघाने त्यांना लंकाद्वीप मध्ये जाऊन बौद्ध धम्माच्या स्थापनेची आज्ञा केली, ती शिरसावंद्य मानून स्थविर उपाध्यायांना वंदन करून सोबत पांच स्थविर इत्थिया, उत्तिया, संबला, भद्दसला आणि सामनेर सुमना सोबत घेऊन धम्माचा प्रचार व प्रसारासाठी लंकाद्वीप गाठले. तो दिवस होता जेष्ठ पौर्णिमेचा.

पुढे काही वर्षांनी भिक्खूनी माता संघमित्राशी बोधिवृक्षाच्या फांदीसह स्थविर महेंद्र यांनी श्रीलंकेस बोलवून घेतले. संघमित्रा अनेक श्रामनेरी सोबत घेऊन लंका द्विपातील अनुराधापूर येथे जम्बुद्वीपातून आणलेली बोधिवृक्षाची एक शाखा तेथील राजा देवानंप्रिय तिस्सला भेटून लावली व तेथे भिक्खूनी संघ स्थापन केला. आजही अनुराधपूर येथे त्या फांदीपासून निर्माण झालेला वृक्ष उभा आहे. हा बोधिवृक्ष भगवान बुद्धांनी दुःख मुक्तीसाठी सांगितलेल्या आर्य अष्टांगिक मार्गाचे पालन करण्यासाठी सर्व मानवामध्ये उत्साह निर्माण करण्याचे महान कार्य करीत आहे. संघमित्रा विवाहित होती व तिला सुमन नावाचा मुलगा होता. आपल्या वडिलांच्या सूचनेवरून ती वयाच्या १९ व्या वर्षी भिक्खूनी झाली. तिचा मुलगाही श्रामणेर झाला व पुढे अर्हंत पदाला पोहचला.

४. थेरी संघमित्ता कृतज्ञता दिवस :–

सम्राट अशोकाची कन्या अरहंत थेरी संघमित्रा हिचे जेष्ठ पौर्णिमा (जेठ्ठ मासो पुंन्नमि) दिवशी श्रीलंकेत आगमन झाले होते. ज्या सौम्य शितल बौधीवृक्षाखाली सिध्दार्थ गौतमाला संम्बोधी प्राप्त झाली होती, त्या पवित्र बोधीवृक्षची शाखा, इतर बरेच धार्मिक साहित्य व सहकारी घेऊन थेरी संघमित्ता हिने श्रीलंकेत प्रवेश केला होता त्या स्मृतिप्रीत्यर्थ जेष्ठ पौर्णिमेला मोठा स्मरणोत्सव साजरा केला जातो.

थेरी संघमित्ता हिच्या श्रीलंका भेटीमुळे पवित्र बोधीवृक्षची शाखा अनुराधापूर येथे स्थापना झाली. तसेच भिक्खूणी संघाची स्थापना झाली. या दोन अतिशय महत्त्वाच्या प्रसंगामुळे स्त्रियांच्या आध्यात्मिक उत्थानाला प्रेरणा व बळ मिळाले. मानसिक निष्क्रियता आणि आध्यात्मिक उदासिनता यातून त्यांची निश्चितच मुक्तता झाली. आंतरिक उंची आणि नैतिक उन्नती साधण्याकरिता त्यांना धैर्य प्राप्त झाले.

भगवान बुद्धाच्या विचारांच्या सुप्रसिद्ध शिष्येने अर्थात थेरी संघमित्ताने जो भिक्खूणी संघ निर्माण केला. त्यामुळे अनेक स्त्रियांना भिक्खूणी बनण्याची प्रेरणा मिळाली. थेरी संघमित्ताने श्रीलंकेतील स्त्रियांमध्ये जो अथक उत्साह आणि आध्यात्मिक उर्जा संचारित केली. त्यामुळे अनेक स्त्रियांनी भिक्खूणी संघात प्रवेश केला. त्यांनी उच्च आदर्शाचे जीवन अंगीकारून उत्कृष्ट धम्मपोदेश म्हणून नावलौकिक मिळविला.

थेरी संघमित्ताने श्रीलंकेतील अनुराधापूर येथे लावलेला बोधीवृक्ष आध्यात्मिक आदेशांचे मूर्त रूप आहे. तो श्रीलंकेतील जनतेमध्ये धम्मभावना चेतविण्यास कारणीभूत ठरला आहे. बुध्दाच्या अतुलनीय गुणांचे स्मरण आणि चिंतन अनेक स्त्रियांना आणि भिक्खूणीना करून देण्याची प्रेरणा ही बोधीवृक्षमुळे मिळाली आहे. श्रीलंकेच्या इतिहासात बोधीवृक्ष आणि त्याचा आसपासचा परिसर हे राष्ट्रीय सन्माननीय आध्यात्मिक केन्द्र राहिले आहे.

श्रीलंकेच्या सर्वात मोठय़ा श्रध्दास्थानात बोधीवृक्षाची व तेथील अतिविशाल महाविहाराची गणना होते. त्या काळात भिक्खू आणि भिक्खूणींनी बोधीवृक्षाची महत्ता जोपासली.

थेरी संघमित्रा हिच्या सोबत स्थापत्य शास्त्रातील पारंगत, मूर्तिकार, चित्रकार, रंगकर्मी, वैद्यक आणि बुध्दशासनात प्रतिष्ठत असे साधक यांचे श्रीलंकेत आगमन झाले. त्यामुळे श्रीलंकेत सांस्कृतिक जागृती झाली. श्रीलंकेतील तरुण वर्ग, सम्राट अशोक कालीन कला व विज्ञान क्षेत्रात पारंगत झाला. त्यांनी श्रीलंकेतील वातावरणाशी जुळणारी कला निर्माण केली. शेवटी थेरी संघमित्रा हिचे धम्मकार्य आणि जनतेच्या हितासाठी महामंगल कार्य करतांना श्रीलंकेच्या हत्थाळ_हक विहारात परिनिब्बाण झाले.

सम्राट अशोकाने ज्यापध्दतीने भारतात बुध्दशासन प्रत्यक्षात आणले होते. त्याचीच पुनरावृत्ती श्रीलंकेत दिसली यामागची प्रेरणा थेरी संघमित्रा आणि तिने लावलेला बोधीवृक्ष आहे म्हणून जेष्ठ पौर्णिमा (जेठ्ठ मासो पुंन्नमि) महिन्याच्या पवित्र पौर्णिमेला थेरी संघमित्रा स्मरण दिवस म्हणून साजरा केला जातो.

५. भिक्खू महेंद्र यांचे निर्वाण :–

बौद्ध धम्माचे विरोधक आणि धर्मांध आक्रमकांनी चौदाव्या शतकापर्यंत भारतातून बौद्ध साहित्य नष्ट केले होते. अशा अवस्थेत महामहेंद्र यांनी श्रीलंकेत ते साहित्य सुरक्षित ठेवले. तसेच अडतीस वर्षे श्रीलंकेत धम्मसेवा करून वयाच्या ८० व्या वर्षी महामहेंद्र यांनी जगाचा निरोप घेतला. श्रीलंकेच्या अनुराधापुरम त्यांचे निर्वाण झाले तो दिवस होता जेष्ठ पौर्णिमेचा.

🔹 कपिलवस्तूच्या जनतेला महासमय सुत्ताचा उपदेश याच पौर्णिमेला केला आहे.

☸️☸️🔵🔵🔵 **आषाढी पौर्णिमा [धम्माचक्रप्रवर्तन दिन] (आसाळ्ह मासो पुंन्नमि)** 🔵🔵🔵☸️☸️

● आषाढ़ी पौर्णिमेचे ऐतिहासिक महत्व ●

आषाढ पौर्णिमेला पुढील घटनेंमुळे प्रमुख मानल्या जाते.

🌸 आजच्याच दिवसी सिद्धार्थ गौतमाने माता महामया यांच्या गर्भात गर्भाधारण केले.

🎯 आजच्याच दिवसी राजकुमार सिद्धार्थाने लोककल्याणाच्या भावनेने महानिभिष्क्रमण केले होते.

🌸 आजच्याच दिवसी बुद्धांनी सारनाथच्या पावन भूमीवर पंच्चवर्गीय भिक्षुंना 'धम्मचक्कप्पवत्तन सुत्त' याचा उपदेश केला.

🎯 आजच्याच दिवसी बुद्धांनी भिक्षुंसाठी पावसाळ्याचे तीन महिने त्रासदायक होऊ नये यासाठी वर्षावास जाहीर केला.

जगात आषाढी पौर्णिमा सर्वात मोठा सण व आनंद उत्सव म्हणून साजरा केला जातो. कारण याच दिनी भगवान बुध्दांनी समस्त मानवाला अविद्येच्या अज्ञान अंधःकरातून मुक्त करणारे आणि प्रज्ञेच्या प्रकाशामध्ये आणणारे ज्ञान उपदेशिले. यासोबतच आषाढ पौर्णिमेचे इतरही अनेक महत्व आहेत याबद्दल ही माहिती वाचा..

पहिले महत्व:– बुद्धांच्या बाबतीत एक कथा सांगितली जाते की गौतम बुद्धांची आई महामाया यांच्या स्वप्नात सुमेध नावाचा बोधिसत्व हत्तीच्या रुपात आला व आपल्या सोंडेने पांढरे कमळाचे फूल महामायेला देऊन तो बोधिसत्व म्हणाला, "माते! मी माझा शेवटचा जन्म तुझ्या कुशीत घेणार आहे. तू माझी आई होशील का?" महामाया म्हणाली, "हो, आनंदाने!" आणि तो सुमेध बोधिसत्व संपूर्ण तिच्या शरीरात सामावला. असा तिला स्वप्नात भास झाला आणि ती जागी झाली. आणि खरोखरच या पौर्णिमेला महामायेला गर्भधारणा झाल्याचे निश्चित झाले. म्हणून या आषाढ पौर्णिमेला गर्भमंगल दिन असेही म्हणतात.

दुसरे महत्व:– सिद्धार्थ गौतम २८ वर्षांचा झाला तेव्हा रोहिणी नदीच्या वाटपावरून शाक्य संघ आणि कोलीय यांच्यात वाद सुरू झाला. शाक्य संघाने कोलीयांविरुद्ध युद्ध करण्याचा संघाच्या बैठकीमध्ये ठराव पास झाला. त्या ठरावाला सिद्धार्थ गौतमाने विरोध केला व चर्चेतून मार्ग काढण्याचा सल्ला दिला. परंतु सिद्धार्थ गौतम संघाच्या विरोधात गेल्यामुळे सिद्धार्थ गौतमासमोर शिक्षेचे पर्याय ठेवले. देहदंड, आईवडिलांची मालमत्ता जप्त, कुटुंबावर सामाजिक बहिष्कार, इ. गौतम बुद्धांनी जे घडले ते स्वतःमुळे घडल्याने शिक्षा स्वतःला व्हावी आईवडिलांना नको असे सांगून गृहत्याग केला. त्या दिवशी आषाढ पौर्णिमा होती.

तिसरे महत्व:– गृहत्याग केल्यावर सिद्धार्थ गौतमाला वेगवेगळ्या गुरुंच्या आश्रमात ज्ञान संपादन केल्यावर तसेच स्वानुभवाने वयाच्या ३५ व्या वर्षी इ. स. पूर्व ५२८ ला वैशाख पौर्णिमेच्या दिवशी गया येथे सम्यक संबोधी प्राप्त झाली व ते सम्यक संबुद्ध झाले. ज्ञानप्राप्ती नंतर बुद्धांनी आपला प्रथम धर्मोपदेशक सारनाथ येथे कौण्डिण्य, वप्प, भद्दीय, अस्सजि आणि महानाम या पाच भिख्खूंना दिला. बौद्ध इतिहासामध्ये पहिल्या धर्मोपदेशाला धम्मचक्र प्रवर्तन सूत्राने संबोधले जाते आणि पाच भिक्षूंना पंचवर्गीय भिक्षु म्हणून ओळखले जाते. आषाढ़ पौर्णिमेच्या ज्या दिवशी बुद्धांनी पाच भिक्षुणां पहिला धर्मोपदेश दिला ती पौर्णिमा आज धम्माचक्रप्रवर्तन दिन नावाने प्रचलित आहे.

चौथे महत्व:– भगवान बुद्धांनी भिक्षुंसाठी पावसाळ्याचे तीन महिने त्रासदायक होऊ नये यासाठी वर्षावास जाहीर केला. भिक्षूने तीन महिने कुठेतरी विहारात, चैत्यस्तूपात आपला वर्षावास करावा आणि स्थानिक उपासक-उपासिकांना धम्म उपदेश करावा, असे सांगितले. (वर्षा म्हणजे पाऊस, वास म्हणजे निवास, निवारा.) भगवान बुद्धाने आपला पहिला वर्षावास सारनाथ येथील ऋषीपत्तन येथेच केला. त्यांनी आपल्या जीवनात एकूण ४६ वर्षावास केले. शेवटचा वर्षावास वैशाली येथे केला. याच पौर्णिमेला भगवान बुद्धांनी साठ भिक्षुंचा समूह झाल्यावर संघाची स्थापना केली.

अशा कारणांनी आषाढ पौर्णिमा महत्त्वाची आहे. आषाढ पौर्णिमा कंबोडिया, थायलंड, श्रीलंका, लाओस, म्यानमार आणि वेगवेगळ्या बौद्ध राष्ट्रांमध्ये साजरी केली जाते.

☸☸🔵🔵🔵 धम्मचक्रप्रवर्तन दिन *आषाढी पौर्णिमा* (आसाळह मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

★ *बुद्ध धम्मातला महत्वाचा दिवस* ★

● आजच्या दिवशी महाराणी महामाया यांना गर्भ धारणा झाली .

● याच पवित्र पौर्णिमेच्या दिनी सिद्धार्थ गौतमाने आपले शाही जीवन त्यागले होते त्यास (महाभिनिष्क्रमण) या नावाने ओळखले जाते.

● राजकुमार सिद्धार्थ आणि राणी यशोधरा यांचे एकमात्र पुत्र राजकुमार राहुल यांचा जन्म ही याच दिनी झाला.

● *तथागत बुद्धांनी त्यांचा प्रथम उपदेश सुद्धा याच पवित्र पौर्णिमेच्या दिनी सारनाथ इथे दिला जो पुढे धम्मचक्रप्रवर्तन सुत्त म्हणून प्रसिद्ध झाला. म्हणजे खऱ्या अर्थाने धम्मचक्रप्रवर्तन दिन पौर्णिमा*

करीता सर्वांनी जमेल तसा वेड काढून आपल्या जवळच्या विहारामध्ये जाऊन वंदन करा. तसेच आपले सण व प्रतीके साजरे करत चला ।। नमो बुध्दाय ।।

।। सब्ब पापस्स अकरण, कुसलस्स उपसंपदा ।।

।। सचित्तपरियोदपनं, एतं बुद्धान शासनं ।।

☸☸🔵🔵🔵 *श्रावण पौर्णिमा* (सावणो मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

१) *अंगुलीमालावर विजय* २) *पहिली धम्म संगीति*

प्रथम महत्व जाणून घेऊया : श्रावण पौर्णिमा भगवान बुद्धांच्या जीवनात महत्वाची ठरली. भगवान बुद्ध श्रावस्तीच्या जेतवनात राहत होते. वर्षावास काळ सुरु होता. त्यावेळी श्रावास्तीतील स्त्री-पुरुष भयभीत होते. राजाकडे रोज तक्रार घेऊन येत होते. कारण श्रावस्तीच्या रहदारीच्या रस्त्यावर एक क्रूर हत्यारा रोज येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंची हत्या करीत होता. आणि त्यांची करंगळी किंवा एक बोट धाग्यात बांधून गळ्यात घालून फिरत होता. म्हणून लोक त्याला अंगुलीमाल म्हणत असत.

श्रावस्ती नगरीचा राजा प्रसेनजीत चिंतेत होता. नगरवासी रोज राजाकडे जाऊन सांगत असत की तुम्ही त्या गुंडाचा डाकुचा बंदोबस्त करा नाहीतर आम्ही नगर सोडून जाऊ. राजाला काय करावे ते समजत नव्हते. त्या समयी भगवान बुद्ध जेतवनात वास्तव्यास होते, आणि राजा प्रसेनजीत हा जेतवनात गेला व त्याने हा सगळा प्रकार तथागतांना सांगितला.

मग दुसऱ्या दिवशी सकाळीच तथागतांनी भिक्षापात्र हातात घेतले आणि अंगुलीमाल ज्या वाटेवर हत्या करीत होता त्या वाटेने चालते झाले. अंगुलीमाल त्याच्या झोपडीत बसला होता. तथागतांना समोरून जातांना त्याने पहिले आणि तो विचार करू लागला, की हा संन्याशी आहे. अंगुलीमालाने आतापर्यंत ९९९ माणसे मारली होती. त्याला त्याचा गुरु *शिलभद्र* याने १००० माणसे मारून त्यांच्या हाताची बोटे *गुरुदक्षिणा* म्हणून मागितली होती. म्हणून एक हजार मनुष्य मारल्यावर हजार माणसांची बोटे घेऊन तो गुरूकडे जाणार होता. अंगुलीमाल खूप आनंदी होता तथागतांना त्या वाटेने येतांना पाहून त्याला त्याची गुरुदक्षिणा पूर्ण होतांना दिसत होती. हातात शस्त्र घेऊन तो तथागतांच्या मागे पळू लागला. तथागत पुढे चालत होते. अंगुलिमाल तथागतांच्या मागे धावत होता परंतु तो त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नव्हता. आणि म्हणून त्याने तथागतांना जोरात ओरडून थांबवण्याचा प्रयत्न केला. तथागत त्याला म्हणाले, अहिंसक मी थांबलो आहे, तूच धावत आहेस, मी स्थिर आहे, तुझे मन चंचल आहे, ते हिसंक बनले आहे. तु विद्वान आहेस, शीलवान आहेस आणि तु अशी जनावरांसारखी मनुष्य हत्या करतोस तुला हे शोभा देत नाही. ह्या सर्वांनी तुझा काय गुन्हा केला होता? म्हणून तु त्यांचा जगण्याचा हक्क हिरावून घेतलास? आणि त्यांची हत्या केली? बघ ती बोटे सडली आहेत. किडे पडले आहेत. त्यांची दुर्गंधी सुटली आहे. ज्ञानी माणसाने हे कृत्य करणे बरे नाही.

भगवान बुद्धांच्या वाणीने अंगुलीमालाच्या मनावर एकेक घाव बसत होते. तसे त्याच्या शरीरातील त्रान कमी होत होते. त्याचे अंग कंप पावत होते. करुणा, मैत्री भाव हा माणसाचा सर्वात महान असा धर्म आहे. तु त्या करुणा, मैत्रीची हत्या करतोस हे पाप आहे. शुद्धीवर ये आणि माणूस म्हणून जग. भगवान बुद्धांच्या वाणीने तो शांत झाला. त्याच्यातील हिंसक वृत्ती संपत आली, आणि त्याने तथागताला शरण आल्याचे सांगितले व आजपासून मी कुणाचीही हत्या करणार नाही अशी कबुली दिली आणि हत्यार फेकून दिले. "मला क्षमा करा मी अज्ञानापोटी हे सर्व केले. मला सन्मार्ग दाखवा." असे म्हणून तो तथागतांच्या चरणी लिन झाला. आणि तथागतांनी त्याला आपला उपासक बनविले तो दिवस होता इ. स. पूर्व 504 त्या दिवशी "श्रावण पौर्णिमा" होती. अंगुलीमालाच्या आईचे नाव "मैत्रायनी" होते, तर वडिलांचे नाव "गार्ग" असे होते. अंगुलीमाल पुढे जाऊन महान भिक्षु झाला आणि त्याने निर्वाण प्राप्त केले व अरहंत पदास गेला.

"दुसरी घटना" अशी की, भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर सुभद्र नावाचा भिक्षु संघात दिशाभूल करू लागला, मन मानेल तसा अपप्रचार करू लागला आणि भिक्षुसंघाच्या विनयामध्ये बदल होऊ लागला. त्याला प्रतिबंध करून भगवंताच्या वचनांचे सांगायन करण्यासाठी भगवंतांचे आवडते शिष्य महाकाश्यपांनी पाचशे अरहंत भिक्षुंची "पहिली धम्मसंगिती" श्रावण पौर्णिमेला आयोजित केली. ही धम्मसंगिती "ग्रुधकूट पर्वत:वरील सप्तवर्णी गुंफा" येथे आयोजित केली. भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर तीन महिन्यांनी ही धम्मसंगिती झाली. त्रिपीटकाचे संगायन या संगीतिमद्धे झाले. आणि "जगात सर्वात प्रथम धम्मग्रंथ निर्माण झाला तो त्रिपीटक होय."

मानवाच्या दु:खमुक्तीचे समग्र ज्ञान या ग्रंथात समावलेले आहे. म्हणून या पौर्णिमेला जगात आगळेवेगळे महत्व प्राप्त झाले आहे.

☸☸🔵🔵🔵 "भाद्रपद पौर्णिमा" (पोठ्ठपाद मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

भाद्रपद पौर्णिमेला पाली भाषेत पोठ्ठपादो मासो म्हणतात. ही पौर्णिमा साधारणतः सप्टेंबर महिन्यात येते. या पौर्णिमेला बुद्धाच्या जीवनातील काही महतवपुर्ण घटना घडल्यात.

१. भगवंताचा प्रसेनजीत राजास उपदेश; २. वर्षावासाची तिसरी पौर्णिमा; ३. भगवान बुद्धाचे वर्षावास; ४. राजा बिबींसार यांचे 'पहिले अष्टशिल व्रत'; ५. जगातील पहिले शल्यविशारद; ६. भिक्खु संघाचे क्षुल्लक कारणावरून कलह होऊन दोन समुह; ७. "त्रिपिटीका" स्थापना.

१. भगवंताचा प्रसेनजीत राजास उपदेश :–

तथागत जेतवनात असतांना राजा प्रसेनजीत त्यांच्याकडे गेला व धम्मोपदेश देण्याची हात जोडून विनंती केली. भगवंताने राजाला पुढील प्रमाणे उपदेश दिला.

१. आपली चांगली किंवा वाईट कर्मे आपल्या छायेप्रमाणे पाठलाग करीत असतात. २. मैत्रीपूर्ण हृदयाची आवश्यकता सर्वाधिक आहे. ३. आपल्या प्रजेस आपल्या एकुलत्या एक अपत्यासारखे समजावे. ४. दुसऱ्यांना खाली पाडून स्वतः वर नेण्याचा प्रयत्न करू नये. ५. दु:खी लोकांना सांत्वना द्यावी. ६. राजकीय थाटामाटाला जास्त महत्व देऊ नये. ७. खुशामती लोकांच्या गोडगोड गोष्टी ऐकू नये. ८. कायाक्लेशाने स्वतःस त्रास देऊ नये. ९. धम्म आणि सुमार्ग याचा विचार करावा. १०. अन्याय करू नये. ११. कामाग्नीचे भय सर्वांसाठी समान आहे. १२. जो एकवेळ त्या भोवऱ्यात फसेल त्याचे बाहेर निघणे कठीण आहे. १३. धम्माची अशी मागणी आहे की मार रुपी शत्रूंपासून स्वतःला सुरक्षित ठेवावे. १४. स्वतःच्या विचारांवर नजर असू द्यावी. १५. भौतिक वस्तूंच्या तुच्छतेवर खोलवर विचार करायला पाहिजे. १६. जीवनाच्या अस्थिरतेला चांगल्या प्रकारे समजून घ्यावे. १७. राजधर्म नियमांचे उल्लंघन करू नये. १८. बाह्य पदार्थांना आपल्या प्रसन्नतेचा आधार न बनविता प्रीतीयुक्त मनासच प्रसन्नतेचा आधार बनवावे म्हणचे राजाचे यश भविष्यात अमर होईल.

२. वर्षावासाची तिसरी पौर्णिमा :–

वर्षावासात एकूण चार पौर्णिमा येतात. भाद्रपद पौर्णिमा ही वर्षावासात येणारी तिसरी पौर्णिमा. या वर्षावासाची सुरवातही अहिंसेच्या पुरतेखातर, करूणा व मैत्रिभावणेच्या गरजेतुन झाली. पावसाळ्याच्या दिवसात भिक्खूगण एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पायी चालत जातांना गवतातील कीटक त्यांच्या पायाने मारले जायचे. अशा प्रकारेही आपणावर हिंसेचे पातक नको, म्हणून वरील तीन महिन्यांच्या कालावधीपूरती भिक्खुंची भ्रमंती स्थगित करून कोणा एका ठिकाणी मुक्काम करून धम्माची शिकवण भिक्खुंनी अनुयायांना द्यावी असे वचन भगवंतांनी घातले.

३. भगवान बुद्धाचे वर्षावास :–

भगवान बुद्धाने संबोधी प्राप्त केल्यानंतर धम्म–प्रचाराच्या कालावधीत ४५ वर्षे सतत पायी प्रवास करून पवित्र असा धम्म जगास दिला. भगवंतांनी आपला वर्षावास सारनाथ येथे संपन्न केला. त्यांच्या सारनाथ येथील वर्षावासांसह एकूण ४६ वर्षावास झाले.

सारनाथ – १; राजगृह – ५; वैशाली – २; मुंकुल पर्वत – २; संसुमारगिरी – २; कौशम्बी – १; परिलेयक – १; नाला – १; वैरंजा – १; चालिय पर्वत – ३; श्रावस्ती – २५; आलवी – १; कपिलवस्तु – १.

४. राजा बिबींसार यांचे 'पहिले अष्टशिल व्रत' :–

वर्षावासात तथागत भिक्खू संघासोबत मगध राज्यात वास्तव्य करत असताना उतरत्या वयात मगध नरेश *राजा बिबींसार* यांनी *उच्चासन, आभूषण आणि वैभवशाली दिनचर्येचा त्याग करून* तथागतांच्या उपदेशातून प्रेरणा घेत ऐश्चिक सुखाचा त्याग करून *'पहिले अष्टशिल व्रत'* धारण केले होते.

तो दिवस म्हणजे आजचा मंगल दिन म्हणजे *"भाद्रपद पौर्णिमा"* हा होय.

५. जगातील पहिले शल्यविशारद :–

'जगातील पहिले शल्यविशारद' (सर्जन) *'जिवक'* यांच्याव्दारे मगध नरेश *राजा बिबींसार* यांचा पुत्र आणि राजगृह नगरीचा *राजा अजातशत्रू* यांची तथागतांबरोबर पहिली भेट झाली, तो महत्त्वाचा दिवस म्हणजे *"भाद्रपद पौर्णिमा".*

६. भिक्खु संघाचे क्षुल्लक कारणावरून कलह होऊन दोन समुह :–

महाकारुणिक तथागत सम्यक संबुद्ध भगवान बुध्दांनी कोसंबी येथे वास्तव्यास असताना भिक्खु संघाचे क्षुल्लक कारणावरून कलह होऊन दोन समुह झाले होते. अनेक वेळा समजावुनही समजत नसल्याकारणाने शेवटी भगवान बुध्दांनी त्या सर्व भिक्खुंना शिक्षा म्हणुन वर्षावासाच्या कालखंडासाठी स्वतः *परिलेय्य वनात* निघुन गेले होते. तेव्हा तथागतांच्या करुणा मैत्रीने प्रभावित झालेले हत्ती, वानर असे अनेक वन्यप्राणी जंगलात तथागतांच्या सानिध्यात मोकळे वावरत होते. तेव्हा गावांमध्ये भिक्षाटन करतांना अनेक घटनाक्रमातून अनुभव घेत भिक्खु गणांस आपले चुक लक्षात आली व वनात जाऊन तथागतांची माफी मागितली व यापुढे असे कलह न करणेबाबत वचनबद्ध होऊन परस्पर *'एकता'* कायम केली. याची नोंद *त्रिरत्न वंदना* मधील *संघ वंदनेत* राखली गेली.

#मधु_पौर्णिमा

एकदा तथागतांच्या दोन शिष्यांना कुठल्या तरी कारणाने भांडण झाली परंतु ते दोन्ही गट ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्या दोन्ही गटात शांतता प्रस्थापित करण्यासाठी बुध्द काहीही न बोलता परिलेय वनात निघून गेले. आख्यायिकेनुसार बुध्द #परिलेय वनात गेल्यावर तेथे असलेल्या #परियेय्यक नावाच्या वानराने त्यांना मध दान म्हणून दिले बुध्दांनी ते दान स्विकारले, ते दान स्विकारल्याने वानराला अतिशय आनंद झाला, आनंदाच्याभरात तो वानर इकडून तिकडे व तिकडून इकडे झाडावर उड्या मारु लागला यात त्या वानराचा पाय घसरुन खाली पडला, झाडा वरून खाली पडुन त्याचा जागीच मृत्यू झाला. दानामुळे त्याचा जन्म तावतींस स्वर्गात झाला.

#पलीलायक नावाचा एक हत्ती देखील त्या वानरा सोबत बुध्दांना फळे दान देते असे, काही काळाने पाऊस कमी झाल्यावर स्थानिक सामान्य लोकांनी त्या दोन भिक्खूंच्या गटावर दबाव आणला व बुध्दांना पुन्हा आणण्यासाठी एक प्रतिनिधी गट धाडण्यात आले. बुध्दांना आमंत्रण देण्यात आले बुध्दांनी त्यावेळेस प्रवचन दिले त्या प्रवचनात त्यांनी हत्ती कडे बोट दाखवत बुध्द म्हणाले, "योग्य जोडीदारा अभावी हा हत्ती एकटाच वनात एकटाच विहार करतो, ज्ञानी आणि उच्च विचारी लोकांचा सहवास मिळाला नाही, तर या जगात एकटे रहाणे कधीही चांगले. कारण मुर्खांचे सहवास कधीही दु:खच वाढवतील."

बुध्द शहरा कडे निघाले तेव्हा हत्ती पलीलायक याचे मन खुप दुखावले तो बुध्दांच्या मागे मागे जाऊन लागला वनाची सीमा जवळ आल्यावर बुध्दांना पलीलायकला सांगितले तुझी सीमा संपली पुढे मानवी सीमा सुरू झाली आहे. मानवी प्रदेशात तुझ्या सारख्या प्राण्यांना खुप धोका आहे. तु माझ्यासोबत येऊ नकोस पलीलायक हत्ती तेथेच थांबला तो बुध्दांच्या पुढे जाऊ शकला नाही. बुध्द नजरेआड होताच, दु:ख पलीलायकचे हृदय फुटले तिथे त्याचा मृत्यू झाला. एकच वेळेस वानर व हत्तीचा मृत्यू झाला दोघेही तावतींस स्वर्गात उत्पन्न झाले.

बोध :- एकता, दान, एकांतवास, मुर्खाची संगत न करणे दान केल्यास सुगती प्राप्त होते.

७. "त्रिपिटीका" स्थापना :-

तथागतांच्या महानिर्वाणानंतर भिक्खु संघातील वर्तनावर अंकुश म्हणून राजगृह नगरीचा राजा *अजातशत्रू* यांच्या सान्निध्यात *महास्थविर भदंन्त महाकाश्यप* यांच्या अधिपत्याखाली आखलेल्या भगवान तथागतांच्या बुद्धवचनांचा संग्रह गृधकुट पर्वत, *सप्तपर्णी गुफेत* राजगृहात सुरु असतांना *पहिल्या धम्मसंगिनी* मध्ये महाकाश्यापांनी भिक्षु आनंदाला सुत्तासंबंधी प्रश्न विचारले, तेव्हा आनंदाने सर्व प्रश्नांची उत्तरे सविस्तररीत्या दिली. त्यानंतर भाद्रपद पौर्णिमेला भिक्षु विनयासंबंधी महाकाश्यापांनी भिक्षु उपाली यांना प्रश्न विचारण्यास प्रारंभ केला. या पौर्णिमेच्या दिवशी उपालींनी अतिशय उत्साहाने उत्तर देणे मान्य करून सुरुवात केली. पुढे अभिधम्मा विषयी बुद्धावचनांचा संग्रह करण्यासाठी महाकाश्यपांनी भिक्षु आनंदाला प्रश्न विचारले. आनंदाने सुद्धा सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली. श्रावण, भाद्रपद आणि अश्विन या तीन महिन्यात बुद्धावाचनांचा अचूक त्रिपिटक संग्रह तयार झाला.

वर्षावास कालखंडातील हि एक महत्वपूर्ण पौर्णिमा आहे. म्हणून सर्व बौद्धजन उपोसथ व्रत धारण करून हि पौर्णिमा साजरी करतात.

"सर्व उपासक/उपासिकांना पौर्णिमेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा"

सर्वांचे मंगल होवो

! जय भीम !   !! जय भारत !!   !!! नमो बुद्धाय !!!

☸☸🔵🔵🔵 "अश्विन पौर्णिमा" (अस्सयुजो मासो पुंन्नमि) वर्षावास समाप्ती 🔵🔵🔵☸☸

१. सम्राट अशोकाची धम्मदीक्षा. २. सर्व अर्हंत भिक्षूंना धम्मप्रचार प्रसारासाठी सारनाथ येथे आदेश दिला. ३. वर्षावास समाप्ती : वर्षावासातील चर्चा दरम्यान तापलेल्या मनाला शांत करण्यासाठी सामुहिकरित्या दुध प्राशन करूने.

अश्विन पौर्णिमेला पाली भाषेत *अस्सयुज मासो* म्हणतात. ही पौर्णिमा साधारणतः ऑक्टोबर महिन्यात येते. या पौर्णिमेला बुद्धाच्या जीवनातील काही महत्वपुर्ण घटना घडल्यात.

१. सम्राट अशोकाची धम्मदीक्षा :-

सम्राट अशोकाने राज्यभिषेकाच्या आठव्या वर्षी कलिंगची लढाई जिंकली. याच युद्धाने अशोकाच्या जीवनात मोठी क्रांती घडवून आणली आणि हेच युद्ध अशोकाच्या जीवनातील शेवटचे युद्ध ठरले. या युद्धाने जो विनाश झाला त्याचा अशोकाच्या जीवनावर फार गंभीर परिणाम झाला. युद्धात मारल्या गेलेल्या सैनिकांच्या विधवांच्या रडण्याचे, बालकांच्या अक्रोशाने त्याला खूप पश्चाताप झाला. तो शोकाकुल झाला. त्याचवेळी मोग्गलीपुत्त तिस्स या भिक्खूची भेट झाली. त्याच्या *अप्पमाद-वग्ग* (अप्रमादवग्ग) या उपदेशाने त्यांचे संपूर्ण जीवनच बदलून गेले. भन्ते मोग्गलीपुत्त तिस्स यांस सम्राट अशोकाने आपला धम्म गुरू मानले. ज्या दिवशी भिक्खू मोग्गलीपुत्त तिस्स यांच्या संपर्कात येऊन सम्राटांनी त्यांच्याकडून दीक्षा घेतली. बौद्ध उपासक बनला तो दिवस होता अश्विन शुद्ध दशमी, इ. स. पू. २६६ यासच *अशोक विजयादशमी* किंवा *दसरा* असे म्हणतात.

सम्राट अशोकाने बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि त्यांच्या राज्यात बौद्धधम्माला सर्वोच्च स्थान प्राप्त झाले. त्याचे शासन धम्म शासन असल्याने त्यांचे राज्य *धम्मराज्य* ठरले.

याच अश्विन शुद्ध दशमीलाच डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २५०० पूर्वीचा बौद्ध धम्माला पुनर्जीवित करून धम्माला गतिशील केले. यालाच आपण धम्मचक्र प्रवर्तन म्हणतो.

२. धम्मप्रचार प्रसारासाठी सारनाथ येथे आदेश दिला :-

ह्या पौर्णिमेला भगवान बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तन केले आणि विशुद्धी मार्गाचा क्रमशः उपदेश सुरू केला. या उपदेशाला आषाढी पौर्णिमेपासून सुरुवात केली, प्रथम पांच परिव्राजक भिक्षु झाले. त्यानंतर पुन्हा पांच शिष्य मिळाले. यश, गवांपती, सुबाहु, आणि पूर्णजित असे एकूण दहा शिष्य भगवंतांना मिळाले. त्यानंतर पुन्हा वाराणसीच्या प्रदेशातून पन्नास तरुण भगवंताचे शिष्य झाले. एकूण साठ भिक्षूंचा संघ निर्माण झाला.

भगवान तथागतांच्या संघातील साठही भिक्षु अर्हंतपदाला गेले. भगवंतांनी अश्विन पौर्णिमेच्या दिवशी सर्व अर्हंत भिक्षूंना धम्मप्रचार प्रसारासाठी सारनाथ येथे आदेश दिला.

❇️चरथ भिक्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकानुकंपाय, अथाय, सुखाय देवमनुसान, देसेथ भिक्खवे धम्मं आदीकल्याण मजझेकल्याण परियोसान कल्याण साथं संव्यजन, केवल परीपुणण ब्रह्मचर्य पकासेथ !!!❇️

हे भिक्षूंनो, बहुजनांच्या हिताकरिता, बहुजनांच्या सुखाकरिता, लोकांवर अनुकंपा करावयाच्या भावनेने, स्वतःच्या तसेच सत्पुरुषांच्या हितासाठी आणि सुखासाठी भिक्षाटन करीत विचरण करा ! हा धम्म सुरुवातीस कल्याणकारी, मध्य कल्याणकारी आणि अंतिम कल्याणकारी असून अर्थ आणि भावाने परिपूर्ण आहे. अशा या धम्माचा ब्रह्मचर्यव्रत राखून प्रसार करा आणि त्याला पूर्ण प्रकाशित करा.

ह्याच अश्विन पौर्णिमेला भगवंतांनी वर्षावासाचा समारोप केला. या दिवसी बौद्ध भिक्षु तीन महिन्यांचा वर्षावास समाप्त करून धम्म प्रचारास निघतात. अश्विन पौर्णिमेला भगवान बुद्धांनी ऋद्धी परिहार्य केले होते. त्याचबरोबर तेव्हापासून बौद्ध जगतात पवरणा उत्सव साजरा केला जातो.

३. वर्षावास समाप्ती :–

अश्विन पौर्णिमा ही वर्षावासातील शेवटची पौर्णिमा आहे. वर्षावास काळात ज्यांनी ज्यांनी सहकार्य दिले त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्ती केली जात असे. वर्षावास काळात उपसिकांमध्ये व्यवस्थापिक होण्याचा मान विशाखा मिगारमाता यांना मिळाला. विशाखा मीगारमाता यांनी भगवंतास व भिक्खू संघास जेवणाचे आमंत्रण दिले. भगवान बुद्ध भिक्खूसंघसह घरी आल्यानंतर विशाखेने सर्वांचा आदर सत्कार केला. जेवू घातले व नंतर भगवंतास आठ वर मागितले. आठ वर मागण्याचे कारण सविस्तर समजून घेऊन तिचे आभार मानले व म्हणाले *शिलसपन्न उपसिका श्रध्दायुक्त मनाने आणि निश्वार्थी वृत्तीने जे काही दान देईल ते दान दिव्य, दुःखनाशक आणि सुखकारक ठरेल.

वर्षा संपल्यावर भिक्खूसंघाचा वर्षावासही संपन्न होतो. अश्विनी पौर्णिमेलाच कोजागिरी पौर्णिमाहि म्हणतात. वर्षावासत होणाऱ्या वादविवादीत चर्चामुळे बऱ्याच भिक्खूंचे मत प्रवर्तित व्हायचे तर बऱ्याच भिक्खूंचे मन देखील दुखावली जात होती.

बुध्दांनी या चर्चाचा सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कोणाच्याही मनात द्वेष भावना न राहावी म्हणून आजच्या दिवशी म्हणजे अश्विनी पौर्णिमा. दुध हे शान्तिप्रिय आहे. त्यातल्यात्यात ते चंद्राच्या शीतल किरणात तापल्यावर त्यात एकप्रकारचे तेज प्राप्त होते.

वर्षावासातील चर्चा दरम्यान तापलेल्या मनाला शांत करण्यासाठी सामुहिकरित्या दुध प्राशन करून दुसऱ्या दिवशी भिक्खू आपआपल्या दिशेने निघत असे कारण बुध्दांचा कटाक्ष होता की कोणतेही दोन भिक्खू एका दिशेने जाणार नाही. एक भिक्खू एकाच दिशेने जाईल. ज्यादिवशी वर्षावास संपतो तो दिवस म्हणजे अश्विनी पौर्णिमा (अस्सयुज मासो) म्हणतात.

ही पौर्णिमा आपण मोठ्या उत्साहाने साजरी केली पाहिजे. बुद्धविहारात जाऊन धम्म ग्रहण करावा.

🌀सर्वांना अश्विन पौर्णिमेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा.🌀

!!! सर्वांचे मंगलं होवो !!!

☸☸🔵🔵🔵 कार्तिक पौर्णिमा (कतिको मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

१. काश्यप बंधूंची धम्मदीक्षा. २. सारीपुत्ताची व महामोग्गल्यायन यांची धम्मदीक्षा. ३. सारीपुत्त व भावंडांची धम्मदीक्षा. ४. महामोग्गल्यायन यांची हत्या. ५.आधुनिक मुलगन्धकुटी विहार. ६. महाप्रजापती गौतमीचे चीवर दान.

कार्तिक पौर्णिमेला पाली भाषेत *कत्तिक मासो* म्हणतात. ही पौर्णिमा साधारणतः नोव्हेंबर महिन्यात येते. वर्षावासाच्या समाप्तीनंतर धम्मप्रचारार्थ बाहेर पडण्याचा महिना म्हणजे कार्तिक महिना. कार्तिक पौर्णिमेला बुद्धाच्या जीवनात व त्यांच्या निर्वाणानंतरही अनेक महत्वपूर्ण घटना घडल्यात.

१. काश्यप बंधूंची धम्मदीक्षा :–

काश्यप बंधू तीन होते, उरुवेला काश्यप, नदी काश्यप आणि गया काश्यप. त्यांचे वास्तव्य वाराणसी मध्ये होते. या तिन्ही बंधूंना जटाधारी काश्यप म्हणून ओळखत असत व त्या प्रत्येकाचे शेकडो शिष्य होते. उरुवेला काश्यपांची कीर्ती ऐकल्यामुळे त्याला उपदेश देण्याचा आणि शक्य झाल्यास धम्माची दीक्षा देण्याचा तथागतांनी विचार केला. काश्यपांची तथागतांनी भेट घेतली व आश्रमात रात्रभर राहू देण्याची विनंती केली. मात्र मुचलींद नावाचा नागराजा अग्निपूजा करणाऱ्यांना रात्री येऊन त्रास देतो म्हणून काश्यपांनी तथागतास आश्रमात राहण्यास नकार दिला. तथागतांच्या आग्रहास्तव काश्यपांनी संमती दिली. तथागतांनी अग्निशाळेत प्रवेश केला व बसले. इकडे काश्यप रात्रभर काळजीने चिंतीत राहिला की तथागताला नागराजाने भस्मसात केले असावे. उजाळल्यावर येऊन बघतात तर नागराजा तथागतांनी पूजा करीत दिसले.

त्यामुळे काश्यप तथागतांनी त्यांचेजवळ राहण्याची विनंती करतो. काश्यप अहंमन्य पुरुष असला तरी तथागत्यांच्या विधानातील सामर्थ्य त्याला जाणवले आणि अतिशय नम्रतेने भगवंताचा सिद्धांत मान्य करून उरुवेला काश्यप बुद्धाचा अनुयायी बनला. काश्यप व त्याच्या अनुयायांना धम्माची दीक्षा देण्यात आली. आपल्या भावाने दीक्षा घेतली

म्हणून आपणही दीक्षा घ्यावी म्हणून उरुवेला काश्यप जवळ येतात. बुद्धाने त्यांना सुद्धा प्रवचन दिले. बुद्धाचे प्रवचन एकूण त्या अग्निपूजेचा आदर कमी झाला आणि बुद्धाचे शिष्य होण्याची इच्छा व्यक्त केली. बुद्धाने त्यांना धम्मदीक्षा दिली. तो दिवस होता कार्तिक पौर्णिमेचा. त्या तिघांना मिळून एक हजार शिष्यांनाही तथागतांनी प्रवज्जीत केले. अशा प्रकारे धम्माचा संघ तीव्र गतीने वाढू लागला.

शेवटी उरुवेला काश्यपांना वाटले की की आपला अंतिम समय जवळ आला आहे. तेव्हा त्यांनी तथागतांजवळ निर्वाणाची अनुमती मागीतली. त्याच दिवशी ते निर्वाणपदास प्राप्त झाले. तो दिवस होता कार्तिक पौर्णिमेचा.

२. सारीपुत्त व महामोग्गल्यायन यांची धम्मदीक्षा :–

सारीपुत्त व महामोग्गल्यायन हे दोघे मित्र होते. दोघांचीही घरची सांपत्तिक स्थिती असतांनाही ऐन तारुण्यात गृहत्याग करण्याचा निर्णय घेतला. दोघेही संजय बेलठिहीपुत्र यांचे शिष्य होते. परंतु संजयच्या उपदेशाने त्यांचे समाधान झाले नव्हते. त्यापेक्षा चांगल्या तत्वज्ञानाच्या शोधात होते. ऐके दिवशी अश्वजीत चारिकेसाठी रस्त्याने जाताना दिसले. त्यांची शांत मुद्रा, संयमित दृष्टी, खाली नजर, संथ चाल, याचा सारीपुत्तावर एवढा प्रभाव पडला की तो भदंत अश्वजिताकडे ओढला गेला व त्याच्या पाठीमागे जाऊ लागला. अश्वजिताचे भोजन झाल्यानंतर सारीपुत्त विचारतो; "तू तुझ्या शास्ता गुरू कोण?" "तू कोणत्या धर्मास माणतोस?" त्यावर अश्वजीत उत्तर देतो; "तथागत माझा शास्ता आहे व त्याच्या धम्मास मी मानतो."

तथागताचा उपदेश सारांश मध्ये सांगितला. सारीपुत्ताचे समाधान झाले. सारीपुत्त व महामोग्गल्यायन हे सख्खे भाऊ जरी नसले तरी सख्ख्या भावाप्रमाणे राहत असत. त्यांनी एकमेकांस वचन दिले होते की ज्यास सत्य सापडेल त्यांनी दुसऱ्यास सांगावे. सारीपुत्तावर महामोग्गल्यायन यास तथागताचा उपदेश सांगितलं आणि दोघेही २५० शिष्यांसह तथागताकडे निघाले. सर्वांनी धम्म स्वीकारला. तो दिवस होता कार्तिक पौर्णिमा. प्रवज्जा स्वीकारल्यापासून सातव्या दिवशी महामोग्गल्यायन यांनी अर्हत पद प्राप्त केले. मात्र सारीपुत्ताने अर्हत पद प्राप्त करण्यास दोन आठवड्याचा कालावधी लावला. आणि दोघांनीही एवढी म्हणता प्राप्त केली की सर्वजण या दोघांना तथागतांचे उजवे–डावे बाहू मानू लागले.

३. सारीपुत्त भावंडांची धम्मदीक्षा :–

सारीपुत्ताचा जन्म अतिशय धनसपन्न परिवारात झाला असला तरी त्याने ऐन तारुण्यात परिवज्जा घेतली. त्याच्या पाठोपाठ त्याचे तीन भाऊ व तीन बहिणींनी सुद्धा परिवज्जा घेतली तो दिवस कार्तिक पौर्णिमेचा होता. सर्व अपत्यांनी परिवज्जा घेतली व गृहत्याग केल्याने त्यांची आई अतिशय व्यथित झाली. आयुष्याच्या शेवटी सारीपुत्ताने आई ला उपदेश केला व त्यानंतर आई सुद्धा दीक्षेनंतर सोतापन्न झाली. तो दिवस होता कार्तिक पौर्णिमेचा.

४. महामोग्गल्यायन यांची हत्या :–

असे म्हणतात की महामोग्गल्यायन यांची कांती निळ्या कमळा समान होती. आजही श्रीलंका मध्ये त्यांची प्रतिमा निळ्या रंगाची बनविली जाते. त्यांचा समाजमनावर अतिशय प्रभाव होता. तथागतांच्या हयातीतच ह्या दोन्ही स्थविरांचे निर्वाण झाले. सारीपुत्ताच्या परिनिर्वानंतर पंधरा दिवसानंतर इ. स. पु. ४८४ च्या कार्तिक अमावस्येच्या दिवशी महामोग्गल्यायन यांची निगंठनांनी निर्दयतेने हत्या केली व इतर भिक्खुंनाही मारहाण केली. या घटनेने भिक्खुसंघात फारच चिंतेचे वातावरण पसरले.

तथागतांनी राजगृहमध्ये एक चैत्याची निर्मिती केली त्याच प्रमाणे मध्यप्रदेशातील विदिशाजवळ साचीचा स्तूप आहे त्या परिसरात एक शांतिस्तुप बांधण्यात आला असून त्यात सारीपुत्त व महामोग्गल्यायन यांच्या अस्थी ठेवण्यात आल्या आहेत. दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या रविवारी त्या अस्थी जनतेसाठी खुल्या असतात. अस्थीच्या दर्शनासाठी जगभरातील बौद्ध उपासक–उपासिका, भिक्खू–भिक्खूनी येतात.

५. आधुनिक मूलगन्धकुटी विहार :–

श्रीलंकानिवासी नागरिक धम्मपाल यांनी तक्षशिला येथें प्राप्त झालेल्या भगवंताच्या पवित्र अस्थी भारतात आणून सारनाथ येथे एक विहार बांधून सुरक्षित ठेवलेल्या आहेत. या विहारासच मुलन्धकुटी विहार असे म्हणतात. दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला तथागताच्या या अस्थी पूजेअर्चेसाठी बाहेर काढतात. संपूर्ण सारनाथमध्ये या अस्थींची मिरवणूक काढून त्या परत विहारात स्थानापन्न केल्या जातात.

६. महाप्रजापती गौतमीचे चीवर दान :–

महाप्रजापती गौतमी स्वतः विणलेले दोन शेले घेऊन तथागतांकडे गेल्या. त्या तथागतांना म्हणाल्या, "भंते ! मी स्वतः कातलेले, विणलेले दोन शेले आपणास अर्पित करीत आहे. भगवंतांनी त्याचा कृपा करून स्वीकार करावा."

असे म्हणतात भगवंतांनी महाप्रजापतीला म्हटले, "गौतमी, हे संघाला दे. संघाला दिल्यास मी पुजीत होईल आणि संघ सुद्धा."

शेवटी महाप्रजापती गौतमीने स्वतः तयार केलेले शेले संघाला दान दिले. त्यांनी अत्यंत परिश्रमाने वर्षावासाच्या तीन महिन्याच्या काळात जे तयार केले होते. ज्या दिवशी शेले दान करण्याची इच्छा त्यांनी तथागतांजवळ केली होती ती कार्तिक पौर्णिमा होती. ती पौर्णिमा कठीण चीवर दानासाठी प्रसिद्ध आहे. या दिवशी भिक्खूंना कठीण चिवर दान देण्यात येते.

अशा या कार्तिक पौर्णिमेच्या सर्वांना मंगलमय कामना.

☸☸🔵🔵🔵 मार्गशीर्ष पौर्णिमा (मग्गसिरो मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

🔹 **पहिलि महत्वाची घटना :**– राजा बिंबिसार व सिध्दार्थची प्रथम भेट. 🔹 **दुसरी महत्वाची घटना :**– देवदत्तचा भगवान बुद्धांना मारण्याचा प्रयत्न. 🔹 **तिसरी महत्वाची घटना :**– नालागिरी हत्तीवर विजय.

🔹 **पहिलि महत्वाची घटना :**– राजा बिंबिसार व सिध्दार्थची प्रथम भेट.

सिध्दार्थाने कपिलवस्तू सोडल्यावर तो मगध देशाची राजधानी राजगृह येथे आला. सिध्दार्थ गौतम मिळेल ती भिक्षा स्वीकारून तो पर्वताच्या एका निवांत कोपऱ्यात जाऊन बसला.

इसवी सन पूर्व ५४४ ते ४१९ या कालावधीत होऊन गेलेला मगध देशाचा राजा बिम्बिसार हा बौद्ध धम्माचा पहिला आश्रयदाता होता. त्यांच्या महान आश्रयाने बौद्ध धम्माचा मोठा विकास होऊ शकला. गौतम बुद्धाचे वडील राजा शुद्धोदन यांच्याशी राजा बिम्बिसार यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. गौतम बुद्ध यांच्यापेक्षा ते ५ वर्षांनी मोठे होते. कोलिय आणि शाक्य यांच्यात रोहिणी नदीच्या पाण्याच्या वाटपावरून युद्ध होऊ नये यासाठी सिद्धार्थ यांनी गृहत्याग व राज्यत्याग करून परीव्रज्या स्वीकारली होती. त्या त्यागाची माहिती राजा बिम्बिसार यांना होती. ज्याठिकाणी सिध्दार्थ गौतम आसनस्थ झाला होता त्याठिकाणी राजा बिंबिसार गेला. त्याच्या शेजारी बसून त्याच्या शरीर स्वास्थ्यविषयी विचारपूस केली. आणि म्हणाला, "बाळ, तुझ्या कुटुंबाशी माझी दृढ मैत्री आहे. ती वंशपरंपरागत असून तिची दृढता चांगली सिध्द झालेली आहे. म्हणून तुला काही सांगावे अशी इच्छा माझ्या मनात निर्माण झाली आहे. माझ्या प्रेमाचे शब्द तु ऐक, धनुष्याची दोरी खेचण्यास लायक असलेले तुझे बलवान दोन बाहू निरूपयोगी राहू देऊ नकोस. ते ही पृथ्वी काय पण त्रैलोक्य जिंकण्यास अधिक सक्षम आहेत. याचकांचे जीवन जगू इच्छिणाऱ्या गौतमा, नामवंत अशा तुझ्या वंशाला शोभणारे तुझे सौंदर्य वार्धक्य येऊन नष्ट होण्यापूर्वी वेळ अजूनही आलेली नाही तोपर्यंत, आत्ताच सर्व सुखाचा उपभोग घे."

अशाप्रकारे, राजा बिंबिसाराने सिध्दार्थला समजवण्याचा खूप प्रयत्न केला. तेव्हा सिध्दार्थने आपल्या शांत आणि स्नेहपूर्ण चेहऱ्यात बदल न करता खंबीर शब्दाने व खणखणीत आवाजात अनेक उदाहरणे देऊन उत्तर दिले. आणि म्हणाला, "आपण जे मला सांगितले ते आपले चारित्र्य, आपला जीवनमार्ग आणि आपल्या कुळाला शोभेल असे आहे. आणि माझा निश्चय पार पाडणे हे देखील माझे चारित्र्य, माझा जीवनमार्ग आणि माझ्या कुळाला शोभेल असेच आहे."

शेवटी राजा बिंबिसार म्हणाला, "तुझी इच्छा तू पूर्ण करण्यास माझी हरकत नाही. तुला जे काही करावयाचे आहे ते सिद्धीस गेल्यानंतर मला भेटण्याची कृपा कर." स्वतः राजाने आपले दोन हात जोडून उत्तर दिले. आणि पुन्हा भेटण्याचे आश्वासन गौतमाकडून घेतल्यावर राजा आपल्या सेवकांन सह राजवाड्यात परतला.

तो दिवस म्हणजे इसपूर्व ५३४ मागसिर मासो मार्गशीर्ष पौर्णिमा होय.

ज्ञानप्राप्ती झाल्यावर गौतम बुद्ध त्यांच्या शिष्यांसह राजगृह येथे आल्यावर राजा बिम्बिसार आपल्या प्रजेसह त्यांच्या स्वागतासाठी नगरच्या प्रवेशद्वारी गेले होते. त्यांनी बुद्धाचे शिष्यत्व पत्करले व बुद्धाच्या मार्गदर्शनाखाली अर्हत प्राप्तीतील सोतापन्न हे पद प्राप्त केले. कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांनी बुद्ध व त्यांचे शिष्य यांना वसतीसाठी करन-वेणू–वन नावाचे बांबूचे वन दिले होते. त्यानंतर राजा बिम्बिसार यांनी बुद्धाच्या विचारांच्या प्रसारासाठी आयुष्यभर योगदान दिले.

🔹 **दुसरी महत्वाची घटना :**– देवदत्तचा भगवान बुद्धांना मारण्याचा प्रयत्न.

देवदत्त हा तथागतांचा आतेभाऊ. त्याने भिक्खू संघात प्रवेश मिळवला होता. देवदत्ताने भिक्खूंसाठी स्वतःचे वेगळेच नियम बनवले होते व ते लागू करावेत यासाठी तो आग्रही होता. त्याला संघाचे प्रमुख पद हवे होते. परंतु त्याची ती योग्यता नसल्याने बुद्धांनी ते ते पद महामोग्गलायन आणि सारीपुत्त यांच्याकडे दिले. त्यामुळे तो द्वेष, मत्सर व क्रोध यांनी वेडा झाला आणि त्याने गौतम बुद्ध यांचा खून करायचा निर्धार केला.*

गौतम बुद्ध गृधकुट पर्वताच्या पायथ्याजवळून जात असताना पर्वताच्या उंच भागावरून त्याने काही लोकांच्या मदतीने मोठा दगड बुद्धाच्या अंगावर खाली लोटला. परंतु तो दगड मध्यंतरी लटकला आणि त्याचा लहानसा तुकडा गौतम बुद्धांच्या पायाला लागला व तेथे लहानशी जखम झाली. अशा प्रकारे पहिला प्रयत्न फसला. नंतर त्याने राजा अजातशत्रू याच्याशी संधान बांधून गौतम बुद्धाची हत्या करण्यासाठी मारेकरी पाठवले. पण पहिला मारेकरी बुद्धाची करूणा, मैत्रीभावना आणि तेज पाहून हिम्मत हरला. बुद्धाला मारण्याऐवजी तो त्यांचा शिष्य बनला. याप्रकारे देवदत्त याचा दुसरा प्रयत्न सुद्धा फसला.

🔹 **तिसरी महत्वाची घटना :**– नालागिरी हत्तीवर विजय.

त्यानंतर देवदत्ताने अजातशत्रूच्या हत्तीशाळेतील एका माहुताला फितवले. तो प्रारंभी तयार न झाल्याने त्याला कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली. शेवटी दबावामुळे नाईलाजाने तो हत्येच्या कटास कबूल झाला. त्यांनी तेथील मदमस्त, धिप्पाड व क्रूर अशा नालागिरी नावाच्या हत्तीला भरपूर दारू पाजली. सकाळी गौतम बुद्ध नगरात चारिका करीत असताना त्या हत्तीला त्यांच्यावर सोडून देण्यात आले. त्याला पाहून रस्त्यावरचे लोक जीवाच्या आकांताने सैरावैरा पळू लागले. गौतम बुद्ध मात्र तेथे शांतपणे उभे राहिले. उदात्त व अथांग करूणा आणि मैत्रीभावना यांच्या साह्याने ते निर्भय व शांत होते. बुद्धांनी त्याला मायेने व प्रेमाने "नालागिरी" म्हणून हाक मारली. तुफान वेगाने येणारा तो नालागिरी हत्ती बुद्धांच्या त्या प्रभावाने व भूमिकेने वरमला. तो शांत तर झालाच शिवाय त्याने पुढचे गुढगे टेकले आणि बुद्धांना अभिवादन केले, बुद्ध त्याला आपुलकीने गोंजारू लागले. याप्रकारे बुद्धाची हत्या करण्याचा देवदात्तचा तिसरा भयंकर उपाय सुद्धा कुचकामी ठरला. तो दिवस होता मार्गशीर्ष पौर्णिमेचा. करूणा, मैत्रीभावना, प्रेम, आपुलकी आणि निर्भयता यांचा उत्कट अविष्कार त्या दिवशी झाला होता. तथागत गौतम बुद्ध यांचा तो महान विजय होता.

मार्गशीर्ष पौर्णिमेचे महत्त्व जयमंगल अठ्ठ गाथेतील तिसऱ्या गाथेत दिसून येते, ते असे...

नालागिरी गजवरं अतिमत्तभुतं *दावाग्गि चक्कमसनीव* *सुदारूणन्तं।*

मेत्तम्बुसेक विधिना जितवा मुनिन्दो *तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि॥*

अर्थ:- ज्या मुनीन्द्राने, दावाग्निचक्र आणि वीजेप्रमाणे अत्यंत भयानक आणि मदोन्मत्त अशा नालागिरी हत्तीला आपल्या मैत्रीरूपी पावसाने जिंकले, त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो.